# प्रकरण दुसरे

## राजकीय चळवळी ( पूर्वार्ध )

# प्रकरण - दुसरे

## राजकीय चळवळी ( पूर्वार्ध )

विसाव्या शतकाच्यापूर्वार्धात संपूर्ण देशभर राष्ट्रीय चळवळीला मोठे उधाण आले होते. त्या चळवळीचा महाराष्ट्रातही तेजस्वी अविष्कार आढळुन येतो.तथापि संस्थानी प्रदेशातील प्रजापक्षीय चळवळ हे दक्षिण महाराष्ट्रातील एक वैशिष्टये पूर्ण राजकीय आंदोलण होते. स्वातंत्र्यपूर्व काळात दक्षिण महाराष्ट्रात लहान मोठी १८ संस्थाने होती. त्यापैकी कोल्हापूर संस्थान हे प्रदेश, लोकसंख्या,उत्पन्न या दृष्टीने सर्वात मोठे होते. सर्व संस्थानात अनियंत्रित राज्यकारभार होता. १९२१ साली पुणे येथे दक्षिणी संस्थांनी हितकारीणी सभा या संघटनेची स्थापना झाली आणि त्यानंतर द महाराष्ट्रातील संस्थांनी प्रदेशात राजकीय जागृती होऊ लागली. राजकीय दृष्टया जागृत बनलेली संस्थांनी प्रजा राजकीय हक्क,जबाबदार सरकार,लोकशाहीचा कारभार इ. मागण्या करू लागली. १९३० सालापासून वेगवेगळ्या संस्थांनात प्रजापरिषादांची स्थापना होऊ लागली. संस्थांनी प्रजा आपल्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी प्रजापरिषादेच्या झेंडयाखाली संघटीत होऊन आंदोलन करु लागली. सांगली,मिरज,भोर व जमखिंडी या चार दक्षिणी संस्थांनात प्रजापरिषादेचा लढा अधिक उग्र बनला आणि दीर्घ काळ चालला .कोल्हापूर संस्थांनात प्रजा - परिषादेचा लढा तीव्र होता.कोल्हापूर संस्थान प्रजापरिषादेला संस्थानच्या कारभारात सहभागी होण्याची अल्प काळ का होईना संधी लाभली होती. दक्षिणी संस्थानांपैकी कोल्हापूर वगळता इतर सर्व संस्थाने ८ मार्च १९४८ रोजी मुंबई प्रांतात विलीन झाले. कोल्हापूर संस्थान मात्र १ मार्च १९४९ रोजी विलीन झाले अशा प्रकारे प्रजापक्षीय चळवळ हे दक्षिण महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्वाचे व वैशिष्टयेपूर्ण असे राजकीय आंदोलन होते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१९३७ साली कोल्हापूर शहरात 'पुढारी' चा जन्म झाला आणि जानेवारी १९३९ पासून त्याचे दैनिकात रुपांतर झाले. त्या काळात कोल्हापूरही करवीर संस्थानची राजधानी होती. त्याच प्रमाणे १९३३ सालापासून सर्व दक्षिणी संस्थानांच्यावर देखरेखकरणाऱ्या ब्रिटिश रेसिडेन्सीचे मुख्यालय सुध्दा कोल्हापूरला आणण्यात आले होते. त्यामुळे प्रारंभापासून 'पुढारी' ने देशभरात चालणाऱ्या राष्ट्रीय चळवळी बरोबरच दक्षिणी संस्थानांतील प्रजापक्षीय चळवळीची विशेष दखल घेणे स्वाभाविक होते. कोल्हापूर व अन्य दक्षिणी संस्थानातील प्रजेमध्ये झालेली राष्ट्रीय जागृती व असंतोष, प्रजेच्या विविध मागण्या, प्रजापरिषदेची स्थापना, आपल्या मागण्यांसाठी प्रजेने दिलेले लढे व उभारलेल्या चळवळी इत्यादी महत्वाच्या राजकिय घडामोडीचे 'पुढारी' त कसे प्रतिबिंब उमटले होते याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे. १ मार्च १९४९ पर्यन्तच्या दक्षिण महाराष्ट्रातील विविध राजकीय चळवळींपूर्ती ही चर्चा मर्यादीत ठेवली आहे. प्रस्तुत विषयासंबंधी 'पुढारी' त प्रसिध्द झालेली बातमी पत्रे, 'पुढारी' चे तत्संबंधीचे अग्रलेख 'पुढारी' च्या स्तंभातून झालेले विविध लेखन यांच्या आधारे दक्षिण महाराष्ट्रातील १ मार्च १९४९ पर्यन्तच्या विविध राजकीय चळवळींची मिमांसा प्रस्तुत प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

करवीर - प्रजा आणि सभा स्वातंत्र्य

दिनांक ४ नोव्हेंबर १९३८ रोजी सकाळी शिरोळ येथे नानासाहेब जगदाळे यांच्या घरी श्री. माधवराव बागल व इतर १५।१६ लोकांची सभा झाली. या सभेत बागल आपल्या भाषणात म्हणाले 'आजपर्यन्त करवीर हद्दीत अनेक सभा झाल्या पण त्या सभांचा कोल्हापूर दरबार कांही परिणाम झाला नाही. तरी करवीर हद्दीत सभा भरवून सभाबंदीचा कायदा मोडला पाहिजे व आम्हांस पाहिजे तसा शेतसारा सरकार ठरवीत नाही तरी (फळा ) शेतसारा द्यावयाचा नाही.' या भाषणामुळे शांततेचा भंग झाला असे समजून माधवराव बागल यांना पकडून त्यांच्यावर खटला भरला त्यांनी जामीन देण्याचे नाकारले व वरील गुन्हा नाकबूल केला.[१]

शेतक-यांनी आपल्या मागण्या करवीर दरबाराला कळविलेल्या होत्या. या मागण्यांचा विचार करुन श्री.छत्रपती राजाराम महाराजांचे प्राइमिनिस्टर रा.सुर्वे यांनी शेतक-यांना शेतसा-यामध्ये सवलत दिली. इंग्रज मुलखाप्रमाणे शेतसारा वसूल करण्याचे मान्य केले व शेतक-यांना सभा घेण्यास परवानगी दिली. शेतकरी ही राजनिष्ठ राहिले.[२]

जाहिरनामा --

रा.सुर्वे प्राईममिनिस्टर सरकार करवीर यांनी दि.४-१-३९ रोजी खालील करवीर दरबाराचा जाहिरनामा प्रस्तृत केला. शिरोळ पेटयांतील शेतक-यांचा सारा माफ नाही. आणेवारी पध्दतीचा अवलंब केला. शेतक-यांना कर्ज मुक्त केले. सावकारांच्या कर्जातून तडजोडीने मोकळे होण्याचा कायदा केला, कर्ज माफक व्याजाच्या दराने लांब मुदतीने शेतक-यांना देण्याचा विचार चालू आहे व लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची स्थापना लवकर होणार असा जाहिरनामा करवीर सरकारने जाहिर केला.[3] अँड.देव यांनी श्री.माधवराव बागलांना ७ जानेवारी १९३९ रोजी,दरबारांनी अटक केली म्हणून हायकोर्टाकडे अर्ज केला.[४] या अर्जाची सुनावनी रा.सावंत व रा.एस.एस.मोसले यांच्या पुढे सुरु झाली.खटला वर्गकरण्यास योग्य कारणाचा अभाव असे जाहीर केले.[५]

श्रीमंत छत्रपती सर राजाराम महाराज यांच्या अध्यक्षतेखाली खाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीत काही ठराव पास करण्यात आले.कोल्हापूर हद्दीतील शेतसारा ब्रिटिश हद्दी इतका करण्याचे व जनतेला भाषण स्वातंत्र्य देण्याचे मान्य करण्यात आले. शिरोळ पेटयांतील श्री.दिनकरराव देसाई, श्री.देशिंगकर,श्री.दादा तात्या देसाई व श्री.लांडगे यांनी दरबाराशी पूर्ण राजनिष्ठेने सहकार्य करण्याची हमी दिली. म्हणून छत्रपती महाराजांनी त्यांची शिक्षा माफ करुन त्यांना मुक्त केले.[६]

करवीर दरबारानी जादा गॅझेट काढुन खालील सवलती दिल्या. शिरोळ पेटयांतील सव्वा टक्के सारा कमीत केला .डेट कन्सिलिएशन अँक्ट

करवीर इलाख्यात लागू करुन त्याची अंमलबजावणी दि. ५-१-३९ पासून केली. शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीची कर्जे देण्याचा विचार चालू आहे. ब्रिटिश हद्दीप्रमाणे लोकांनी सारा भरावा. जनावरांचा बंदोबस्त व सरकारी लाचलुचपत अधिकाऱ्यांना आळा घातला जाईल. सर्वांना भाषण स्वातंत्र्य, शेतकरी, व्यापारी, हरिजन यांना उपयुक्त कायदे व मोर्चा न आणण्याबद्दल सूचना केल्या इ. सवलती जाहीर करण्यात आल्या.[७]

इचलकरंजीत १० हजार लोकांचा मोर्चा फेब्रुवारी १९३९ मध्ये इचलकरंजीत लोकानी मागण्या मांडण्यासाठी व न्याय मिळविण्यासाठी मोर्चा काढला. त्यावेळी या मोर्चाला सामोरे जाऊन राजाराम छत्रपतींनी भाषण केले. त्यांनी मोर्चा कोल्हापूरात नेऊ नका असे आवाहन केले. प्राइमिनिस्टर यांचे कडे इचलकरंजीत रयतेचा अर्ज सादर केला तेव्हा ४१५ हजार शेतकऱ्या कामकऱ्यांचा जमाव होता. दरबारकडून समाधानकारक उत्तर दिल्यामुळे मोर्चा माघारी गेला.[८]

प्रजा परिषदेची स्थापना --

इ. स. १९३१ साली करवीर कॉंग्रेसची स्थापना करण्यात आली. माधवराव बागल हे त्याचे अध्यक्ष होते. संस्थानात कॉंग्रेसची चळवळ करण्यास गांधींनी अनुमती न दिल्यामुळे बागलांनी तिचे अध्यक्षपद १९३९ मध्ये वीर माने यांच्याकडे दिले. संस्थानासंबंधी घेतलेल्या तटस्थ भूमिकेबाबत बागल अस्वस्थ होते. त्यांनी ६-२-३९ रोजी जयसिंगपूर येथील श्रीराम ऑईल मिल्समध्ये प्रजापरिषदेच्या स्थापनेसाठी रत्नाप्पा कुंभार, दिनकरराव पाटील इ. ना. बोलावले त्यांच्यासह सुमारे दोन हजार कार्यकर्ते हजर होते. यावेळी अध्यक्षीय भाषण करत असतानाच १२४ (अ) राजद्रोहाच्या आरोपाखाली पोलिसांनी त्यांना अटक केली. प्रजापरिषदेचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी दि. २५-२-१९३९ रोजी पुन्हा कार्यकर्त्यांची बैठक जयसिंगपूर येथे घेण्यात आली. या बैठकीत प्रजापरिषदेची तात्पुरती घटना तयार करण्यात आली. संस्थानात छत्रपतींच्या अधिपत्याखाली न्याय व संपूर्ण जबाबदार शासन पध्दती स्थापन करणे हे प्रजा परिषदेचे प्रमुख ध्येय ठरविण्यात आले. परंतु

२५-३-१९३९ रोजी जादा गॅझेट काढून कोल्हापूर दरबाराने हीप्रजा परिषद बेकायदा ठरविली.

२७ मार्च १९३९ रोजी बागल खटल्याचा निकाल लागून बागलांना दोन वर्षांची सक्त मजूरी व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा करण्यात आली.दंड नाकारल्यामुळे दंडाच्या वसुलीसाठी बागलाच्या घरातील शाहू महाराजांचा व बागलांचा अर्ध पुतळा जप्त करुन त्याचा लिलाव पण लिलावाची बोली लावण्यास एकही नागरिक आला नाही.[९]

रयत सभेची स्थापना --

दि.१६ मार्च १९३९ रोजी चिखली (कोल्हापूर ) येथे करवीर रयतेची प्रचंड सभा भरली होती.सभेच्या मध्यभागी भगवा झेंडा मोठ्या डौलाने फडकत होता.श्री.कुऱ्हाडे यांनी सभेचा उद्देश सांगितला.श्री.तोडकर वकिलांनी अध्यक्ष स्थान स्विकारुन प्रथम छ.सर राजाराम महाराज यांच्या अभिनंदनाचा ठराव पास केला.नंतर रयत सभा स्थापन करण्याचा ठराव मांडून त्यावर भाषणे झाली. व नंतर श्री.डी.एस.माने यांच्या अध्यक्षतेखाली प्रोव्हिजनल कमिटी नेमण्यात आली.सदर रयत सभेची स्थापना प्रजापरिषदेस विरोध करणे व छत्रपतींचे हात बळकट करणे यासाठीच करण्यात आली होती.[१०]

करवीर इलाखा रयत सभा - ठराव व घटना --

करवीर इलाखा रयत सभेची सभा श्री.तोडकर वकील यांच्या अध्यक्षस्थानी भरुन खालील ठराव मांडला.

१) प्रथम श्रीमंत छत्रपतींचे अभिनंद करण्यात आले. सभा महाराज व गादी यांच्याशी एकनिष्ठ आहे. महाराजांना दीर्घायुश्यायोग लाभावे, महाराजांनी सारा सूट दिला व कर्जमुक्तीचा कायदा महाराजांनी केला त्याबद्दल त्यांचे अभिनंद केले.

२) करवीर इलाखा रयत सभानावांची संस्था स्थापन करण्यात यावी अशी ही सभा ठराव करित आहे.

घटना -- रयत सेमची तात्पुरती घटना या सभेकडून मंजुर करण्यात आली.

श्री.हजारे वकीलांनी दुजोरा दिला.

तात्पुरती कमिटी -- अध्यक्ष मे.डी.एस.माने.

उपाध्यक्ष डी.आर.मोहिते,एम.एस.तोडकर वकील,डी.एस. बने,डॉ.जी.बी.शिंदे,बी.ए.पाटील,के.डी.माने, जनरल सेक्रेटरी - सर्जेराव कृष्णात माने, सर्जेराव ए.पाटील व हजारे,हेरलेकर वकील,जॉ.सेक्रेटरी,कुऱ्हाडे, शिर्के,सं.गरनड,पी.एन.कांबळे,ट्रेझरर - बी.ए.महागांवकर.

सभासद -- के.डी.माने,व्ही.डी.देसाई,धनवडे वकील,ए.पी.सावंत,भाऊसाहेब नानासाहेब पाटील,डी.बी.पाटील,सूर्यवंशी वकील,के.बी.पाटील, ( भूदरगड ) भोसले वकील,जी.एल.माने, गणपतराव साळोखे,डी.एच.सरनाईक, सखाराम माळी, दिनकरराव काशीद, बळवंत लक्ष्मण बोडके,बाबूराव मोहिते, बापूसाहेब पवार,दादा पाटील इ.सभासद हजर होते.

करवीर इलाखा रयत सभेची तात्पुरती घटना --

नांव - करवीर इलाखा रयत सभा. क्षेत्र - जहागिरीसुध्दा करवीर इलाखा.

राजनिष्ठा - छ.साहेब सरकार करवीर व त्यांची गादी यांचेशी सदैव राजनिष्ठ.

निशाण - भगवा झेंडा.

उद्देश - १) सनदशीर रीतीने श्रीमंत छ.अधिपत्याखाली क्रमश: जबाबदार राज्यपध्दती मिळविणे.(२) करवीर इलाख्यांतील अगर बाहेरील इतर कोणत्याही राजकीय संस्था व त्यांचे कार्यकर्ते कसलाही संबंध नाही (३) शेतकऱ्या कामकऱ्या इत्यादि बहुजन समाजाच्या उन्नतीस पोषाक कायदे व व राजकीय हक्क मिळविणे.

कार्यकर्ते मंडळ --

२५० सभासद होतांच त्या त्या पेटयांत अगर जहागिरीत रयत सभा स्थापून या सभासदांतून प्रेसिडेंट,व्हा.प्रेसिडेंट,चेअरमन,सेक्रेटरी,खजानीस व इतर ५ सभासद निवडुन कार्यकारी मंडळ बनविले जाईल.

कचेरी -- मुख्य कचेरी कोल्हापूर शहरात ब्राह्मणेत्तर संघ,नरवीर बाग [११]

करवीर रयत सभेचे प्रचार कार्य --

हातकणंगले तालुक्यात श्री.मे.दादासाहेब खोचीकर वकील,गणपतराव माने वकील,मंडपे व कुऱ्हाडे यांनी यशस्वी दौरा काढून रयत सभेचे प्रचार कार्य केले.

१) मनपांडळे -- या गावात श्रीमंत बुवासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुऱ्हाडे,माने यांची भाषणे झाली.खालील कमिटी नेमली.
अध्यक्ष - बुवासाहेब माधवराव पाटील.
उपाध्यक्ष भाऊ आ.कुरणे, सभासद - बाळाशेटे,बाळू तातोबा शिंगे, कृष्णा बा.चेगुले,तुकाराम आ.सूर्यवंशी,कांबळे, शिंदे इ.

२) वाठार -- सर्वांचे स्वागत गोपाळ ग.कुलकर्णी यांनी केले. गावातील पाण्यासंबंधी श्री.रा.ई.खोचीकर यांचे भाषण झाले.
कमिटी - अध्यक्ष - हरिकृष्णा पाटील,उपाध्यक्ष - रावजी सं.पाटील, सभासद - संभु न्हा.लठ्ठे,दाजी पाटील,केशव भाऊ पाटील,हरि कांबळे, इ. टोप,हालोंडी,शिरोली इ.गावात सभा होऊन कमिट्या नेमल्या गेल्या.तसेच अंबप या गावात सभा होऊन कमिट्या नेमल्या गेल्या.अनेक सभासद सभेला हजर होते.संपूर्ण तालुक्यात रयत सभेने प्रचार कार्य केले. [१२]

रयत सभेच्या मागण्या मान्य --

रयत सभेची बैठक दि.१३ एप्रिल १९३९ रोजी भरली.सभेत सावंत,राणे, शेख,वकील,गाडे,ह.सु.पाटील इ.या मंडळींनी श्रीमंत अमात्यसाहेब यांची भेट घेतली. त्यावेळी जहागिरीचे सेक्रेटरी,खास के.जी.सबनीस व 'सत्यवादी' चे संपादक श्री बाळासाहेब पाटील व 'पुढारी' चे संपादकश्री.ग.गो.जाधव हे ही आले होते.त्यावेळी श्रीमंताकडे खालील मागण्या सादर केल्या (१) गावचा सर्व्हे लवकर तयार करणे (२) मासे मक्ता रद्द करणे (३) खाजगी जागेतील गैरमनाई जातीची झाडे तोडण्यास परवानगी घेण्याचे बंद .जंगल खात्यातील नित्योपयोगी

बाबीवर सवलतीचे दर आकारावे (४) जहागीरीतील लोकांना प्रथम नोकरी (५) ऊसाच्या पिकावरील कर व धनगराच्या बकऱ्यावर पट्टी घेण्यात येते ती रद्द करणे इ. त्या सर्व मागण्या बावडयाच्या श्रीमंतानी मान्य केल्या.

राजनिष्ठा राहाणे व प्रजापरिषदेस विरोध करणे हा उद्देश रयत सभेचा होता. प्रत्येक गावात रयत सभेची स्थापना करणे व प्रसिध्दी मिळविणे या हेतूने रयत सभा स्थापन झाली होती.[१३]

## कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद बेकायदा --

मार्च १९३९ मध्ये कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद ही इ.स.१९०८ च्या क्रिमिनल लॉ अमेंडमेन्ट ॲक्ट नं.१४ च्या १६ व्या कलमान्वये श्रीमंत छत्रपती महाराज सरकार करवीर यांनी बेकायदेशीर ठरविली.करवीर सरकारने खास जादा गॅझेट काढून तसे जाहीर केले. प्रजा परिषदेच्या चळवळीस व प्रचार कार्यास बंदी करण्याच्या दृष्टीने दुरुस्ती कायद्यान्वये सदर संस्थेची कचेरी व तिची स्थावर जंगम मिळकत जप्त करून सरकार जमा करण्याविषयी श्रीमंत छ.महाराज सरकार करवीर यांच्याकडून हुकूम करण्यात आला. जादा गॅझेट काढून कोल्हापूर सं.प्र.बेकायदा ठरविल्यानंतर त्या संस्थेशी संबंध असणाऱ्या लोक सेवा मंडळ, श्री श्रेष्ठी वकील, शेणोलीकर,पोतनीस वकील,बाबुराव हईकर व इतर कार्यकर्ते यांच्या घरांच्या पोलीसांनी रात्री झडत्या घेतल्या,रामभाऊ शेटे यांच्या घरची झडती घेण्यात आली येथे परिषदेचा जमाखर्च,थोडे पैसे वगैरे मिळाले. बाहेर गावीही अशा झडत्या घेण्यात आल्या होत्या.[१४]

## प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन --

श्री माधवराव बागलांनी जेलमध्ये असताना अशी इच्छा व्यक्त केली होती की कार्यकर्त्यानी प्रजापरिषदेचे कार्य नेटाने चालवावे,कायदेभंगाची चळवळ हाती घ्यावी. दि १५ एप्रिल १९३९ रोजी संस्थान हद्दी बाहेर कुपवाड येथे प्रजा परिषदेचे पहिले अधिवेशन भरले.कॉंग्रेस नेते डॉ.पट्टाभिसितारामैय्या हे अधिवेशनाचे अध्यक्ष होते. दिनकरराव देसाई यांनी सर्वांचे स्वागत केले.उपाध्यक्ष

म.दु.श्रेष्ठी होते. सरचिटणीस रत्नाप्पा कुंभार व अनेक कार्यकर्ते हजर होते. या अधिवेशनात अनेक ठराव पास करण्यात आले हे अधिवेशन व्यवस्थित पार पडले.[१५]

देसाई व कुंभार यांच्यावरील राजद्रोहाच्या खटल्याचा निकाल दि. ८ जुलै १९३९ रोजी डिस्ट्रक्ट मॅजिस्ट्रेट रावसा. शेटे यांनी सांगून श्री.देसाई यांना १२४ अ खाली २ वर्षे सक्त मजुरी व १००० रु.दंड आणि रत्नाप्पा कुंभार यांना १२४ अ खाली दोन वर्षे सक्त मजुरी व ५०० रु.दंड, दंड न भरल्यास प्रत्येकी अधिक ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा अशाप्रकारे खटल्याचा निकाल लागून शिक्षा झाल्या.[१६]

प्रजा परिषदेचा जमाखर्च प्रकरण --

निधीच्या जमाखर्चावरून इ.स.१९४१ मध्ये प्रजापरिषदेच्या वरिष्ठ नेत्यात अल्पकाळ तणाव निर्माण झाल्याचे दिसून येते. शिरोळ येथील जेष्ठ कार्यकर्ते नानासाहेब जगदाळे यांनी याबाबत प्रजा परिषदेचे अध्यक्ष माधवराव बागल यांना एक अनावृत्त पत्र पाठवून खुलाशाची मागणी केली होती ते पत्र खालील प्रमाणे माधवराव बागल यांना सवाल. श्री.दिनकरराव देसाई,आण्णासाहेब पाटील व रावबा.मिणचे यांनी प्रजापरिषदेच्या हिशोबाची व शिल्लकेच्या खुलाशाची मागणी बागल यांच्याकडे केली होती. त्याला उत्तर देऊन तुम्ही सदरच्या हिशोबाबद्दल टाळाटाळ केली असून तुमच्यावरील जबाबदारी दूर टाळण्याचा प्रयत्न केला आहे. या संस्थेचे नेते असल्यामुळे ही जबाबदारी टाळता येणार नाही. त्यांनी पैसे दिले त्यानी तुमच्या व आमच्यावरील श्रध्देने दिले आहेत. या हिशोबाची प्रत्यक्ष जबाबदारी तुम्ही टाळली तर दि.१४-११-१९३९ ते ३-३-१९४० पर्यन्त जी चळवळ चाललेली आहे, त्या चळवळीसाठी जनतेने गुप्त देणग्या दिल्या होत्या त्यातूनच खर्च झाला.पैशाच्या प्रचंड ओघामुळेच आम्हांला प्रचंड आंदोलन करता आले. त्या पैशाची व हिशोबाची जबाबदारी व्यक्तीश: तुमच्यावर आहे कारण दि.३-३-१९४० च्या मुक्ततेनंतर जो आमच्या समवेत तुम्ही दौरा काढला त्यावेळी गांवगन्ना मिळालेल्या थैल्या सार्वजनिक कार्याकरिता, त्यावेळची चळवळ

चालविण्याकरिताच होत्या. या सर्वांचा विचार करून आपण प्रजापरिषदेचा हिशोब व शिल्लक जाहीर करावी व केव्हा जाहीर करणार याची तारीख जाहीर करावी.

नानासाहेब जगदाळे.[१७]

१० डिसेंबर १९४१ — शिरोळ.

दि. २३ डिसेंबर १९४१ रोजी शिरोळ येथे बागलांचे व्याख्यान झाले हे भाषण चालू असताना लोकांनी विरोध करून प्रजापरिषदेस ज्या गुप्त देणग्या मिळाल्या त्यांचा जमा खर्च नसल्याने ७,८ हजाराची रक्कम कोठे गडप झाली असा प्रश्न विचारला. त्यावेळी बागलांनी कानावर हात ठेवले. गेल्या वर्षी दुष्काळ असताना तुम्ही का आला नाही ? असा सवाल विचारला, त्यावेळी बागल सभेतून निघून गेले.[१८]

## कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचा हिशोब --

माधवराव बागल यांनी रत्नाप्पा कुंभारांना प्रेमाची व आग्रहाची सूचना केल्यामुळे त्यांनी प्रजापरिषदेचा हिशोब सादर केला. शंकरराव देव व बा. वि. शिखरे यांचा प्रजापरिषदेच्या हिशोबाशी कसल्याही प्रकारचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले. तसेच बागल यांचा या हिशोबाशी कांही संबंध नाही. त्यांच्यावर कसलीही जबाबदारी नाही. हिशोबाची संपूर्ण जबाबदारी स्विकारून आज मी खालील हिशोब सादर करीत आहे असे रत्नाप्पा कुंभार यांनी जाहीर केले.

१,४४३ रुपये प्रवास खर्च. ५० रुपये विद्याविलासकारांचे प्रचार कार्यासाठी.

जमा

| | |
|---|---|
| स्वागत सभासद वर्गणी | २,१७५ (६६)६ पैसे शिरोळपेटा. |
| हातकणंगले | २,०१७ |
| करवीर | १०५ |
| पन्हाळा | १,८६६,१५ पैसे |
| भुदरगड | ५३ |

| | |
|---|---|
| गडहिंग्लज | ३४०,८,५पैसे |
| कागल | १४५ |
| मलकापूर | १२ |
| गगनबावडा | ५७ |
| कापशी | ४२ |
| हिम्मतबहादरज | ४२ |
| तोरगळ ( कटकोळ ) | ४३ |
| रायबाग | १८९ |
| सराफअसोसिएशन | ९१७ |
| कापड असोसिएशन | १७६ |
| शाहूवाडी | ४०६ |
| इतर लोक शाहूवाडी | १९४ |
| | ------ |
| एकूण | ७,१९,८८,४८६ पैसे |
| मोहनराव शहाणे जळगाव यांच्याकडे -- | ५ |
| श्रेष्ठी वकिल | २५ |
| | --------- |
| | ७,२२,८८,४८६ पैसे |

खर्च
---

| | |
|---|---|
| हारतुरे | ४४६८११८९ पैसे |
| फोटो व मंडप वगैरे | ५८१८१०८९ -॥- |
| भोजन | २५७८७८९ -॥- |
| स्वयंसेवक | १४४३८१८९ -॥- |
| प्रवास | ३८०८९८३ -॥- |
| टपाल | ३९४८४८९ -॥- |
| कचेरी | ९१७८१४ -॥- |
| छपाई | ७३८८८८३ -॥- |

| | |
|---|---|
| श्री रावजी देवाप्पा मिणचे यांच्याकडे स्वागत सभासद वर्गणी | ५६६८ -।।- |
| श्री नानासाहेब जगदाळे यांचे घराकडे व सामान आणण्यास ) दिले त्याची पावती न आल्यामुळे त्यांचे नावे एकूण खर्च ) | ) ५३१६६१२६३ पैसे |
| शिल्लक ता. १५-६-३९ अखेर | १९१११६८८६३ पैकी |
| मिरज स्टेट बॅन्केत | १८०० |
| श्री बाबूराव गोखले | ५० |
| बच्चाजी कुलकर्णी यांस तात्पुरत्या खर्चासाठी | ६१६८३ पैसे |

रत्नाप्पा कुंभार.

माधवराव बागलांकडे नानासाहेब जगदाळेयांनी हिशोबाबाबत पत्रक काढून मागणी केली होती. प्र.प.खर्चाचा संपूर्ण हिशोब रत्नाप्पा कुंभार यांनी सेक्रेटरी या नात्याने सादर केला.[१९]

प्रजा परिषाद दिन --

दि. ७-१२-१९४२ रोजी कोल्हापूर येथे प्रजापरिषाद दिन साजरा करण्यात आला. रात्री ८ वाजता रविवार बुरजा समोर नागरिकांची प्रचंड सभा भरली होती. शहरातील निरनिराळ्या विभागातून सायंकाळी ६ वाजल्यापासून लोक येत होते. मजूर संघ होता, अग्रभागी श्री. माधवराव बागल चालत होते. विद्यार्थी संघ, नोकर संघ, शिवाजी पेठेतून मिरवणूका निघाल्या. पिण्याच्या पाण्याची सोय करा, फॅक्टरी अॅक्ट लागू करा, महागाई भत्यांत वाढ करा, गुमास्ता कायदा लागू करा इ. फलक होते. १० हजार लोक उपस्थित होते. भगवा झेंडा व तिरंगा झेंडा दिसत होता. श्री. नी. गो. पंडितराव यांचे भाषाण झाले. नंतर बागलांचे भाषाण झाले. त्यांनी प्रजा परिषाद कार्याचा आढावा घेतला. जुगारी अड्डे, फॅक्टरी अॅक्ट, इलाख्यातील पार्के व विद्यार्थी फी वाढ रद्द करण्याची मागणी केली. बहुसंख्यांक वर्गाला नोकऱ्या अधिक मिळाल्या पाहिजे पेरी मंत्री मंडळ आल्यावर

आमच्या मागण्या मान्य होतील असे बागल म्हणाले. मराठा,अस्पृश्य,मुसलमान इ.समाजातील सर्वांना नोकऱ्या मिळाव्यात. सर्व धर्माच्या,सर्व जातींच्या लोकांनी प्रजापरिषादेत सामील होऊन प्रजा परिषाद बळकट करावी अशी विनंती त्यांनी केली.नंतर श्रेष्ठी वकिल,कौलजगी,माधवराव भोसले व नगराध्यक्ष मे.वसंतराव बागल वगैरेची भाषाणे झाली. शेवटी वंदे मातरम होऊन सभा संपली.अशा प्रकारच्या आपल्या मागण्या,गाऱ्हाणे,अडअडचणी दरबाराच्या कानावर घालण्याचा प्रयत्न या सभेने केला.[२०]

प्रजापरिषादेचे दुसरे अधिवेशन --

इ.स.१९४१ च्या नगर पालिका निवडणुकीत यश प्राप्त झाल्यानंतर कार्यकर्त्यांना संघटित करून उत्साह वाढावा म्हणून दि.१ व २ जून १९४२ रोजी कोल्हापूरात प्रजापरिषादेचे दुसरे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाच्या अध्यपदी बाळासाहेब खेर व स्वागताध्यक्षपदी माधवराव बागल होते. बागलांनी आपल्या भाषाणात गरीब जनतेपुढे व्याज,खंड, कर,वेतन हे प्रमुख प्रश्न असून ते सोडविण्यासाठी जबाबदार शासन पध्दती मिळविणे हे प्रजा परिषादेचे मुख्य ध्येय आहे असे प्रतिपादन केले. संस्थानातील प्रजापरिषादेवरील बंदी दरबाराने उठवावी असे आवाहन त्यांनी केले. बागलांची प्रजापरिषादेच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. बागलानी कायदे जाणणारे वकील, विद्यार्थी,शेतकरी, धनिक यांचे प्रतिनिधी प्रजा परिषाद कार्यकारिणीत निवडले. या अधिवेशनासाठी राष्ट्र सेवादलाचे स्वयंसेवक,शाहुमिल मजूर संघ, ग्रामस्थ, विद्यार्थिनी,व इतर लोक मिळून ७-८ शेतकरी लोक सामील झाले. युसुफ मेहेरअल्ली, श्री.केशवराव जेधे,काकासाहेब गाडगीळ,शंकरराव देव, व स्वागत अध्यक्ष माधवराव बागल ,नगराध्यक्ष श्रेष्ठी वकिल श्री.वसंतराव बागल,रत्नाप्पा कुंभार अधिवेशनाचे स्वागत सभासद,प्रतिनिधी व इतर प्रेषाक इ.मंडळी हजर होती.[२१]

'पुढारी' कार ग.गो.जाधव यांनी दि.७ जून १९४२ च्या अग्रलेखात प्रजापरिषादेचे ठराव खालील प्रमाणे सांगितले आहे. कोल्हापूर संस्थान प्रजा

परिषादेचे दुसरे अधिवेशन पार पडले. त्या मध्ये १२ ठराव पास करण्यात आले. त्यामध्ये खालील महत्वाचा ठराव मांडण्यात आला. जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करुन परिषाद थांबलेली नाही तर संपूर्ण लोक नियुक्त कायदे मंडळ, त्या कायदेमंडळास जबाबदार असे मंत्रिमंडळ व नागरिक स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क, तपशीलवार घटना ठरविण्याकरिता एक कमिटी नेमावी, अशा प्रकारचे ठराव प्रजा परिषादेच्या दुसऱ्या अधिवेशनात पास करण्यात आले.

संस्थानातील इनामदार - दुमालदारांचे दिवाणी, फौजदारी व मुलकी अधिकार काढून घ्यावेत अशी मागणी केली आहे. जहागिरींच्या बाबतीत प्रजा परिषादेचे धोरण स्पष्ट नसल्यामुळेच प्रजा परिषादेबद्दल जहागीरीतील प्रजाजनांना आपुलकी वाटत नव्हती. जहागिरांचा वास्तविक दर्जा, त्यांना दरबाराने दिलेले अधिकार, जहागिर प्रजेला दुहेरी सत्तेमुळे होणारा त्रास व १० लाख प्रजेच्या राजकीय प्रगतीत जहागिरीकडुन होणारा अडथळा इत्यादी प्रश्नांचा अभ्यास करुन प्रजापरिषादेने जनहिताच्या दृष्टीने आपले निश्चित व नि:संदिग्ध धोरण व्यक्त केले तर वाद मिटतील असे स्पष्ट मत पुढारीकारांनी आपल्या अग्रलेखात व्यक्त केले आहे.[२२]

श्रीमंत महाराणीसाहेबांना प्रजापरिषादेचे मानपत्र -

अधिवेशनात मागणी केल्यानंतर अवघ्या दोन दिवसानंतर म्हणजे ५ जून १९४२ रोजी संस्थानातील प्रजा परिषादेवरील बंदी उठविण्यात आली. प्रजा परिषादेवरील बंदी उठल्यानंतर बागलांनी महाराणी ताराबाईंना प्रजापरिषादेच्या वतीने मानपत्र देण्याचा निर्णय घेतला. दि. १४ जुलै १९४२ प्रजापरिषादेच्या वतीने श्रीमंतमहाराणी साहेबांना मानपत्र १२। वाजता जुन्या राजवाड्यातील मंडपात देण्याचे नियोजन केले होते. या समारंभास पंतप्रधान मे. पेरी, रावबा. दुंदुलकर, रावब डॉ. पाटील, बॅ. केळकर, श्रीमंत बाबाराजे सर्डेकर, श्रीमंत हिम्मतबहाद्दर, दरबाराचे इतर प्रमुख अधिकारी, सातारचे रयत सेवक, भाऊराव पाटील, प्रजा परिषादेचे कार्यकर्ते, स्त्री-पुरुषा, वगैरे श्रीमंत महाराणीसाहेबांच्या बरोबर प्रिन्सेस पद्मराजे व श्रीमंत विक्रमसिंहराव महाराज होते.

12138
A

श्री माधवराव बागलांनी मानपत्र वाचून दाखविले व ते श्रीमंत महाराणी साहेबांना अर्पण करून त्यांना पुष्पहार घातला. नोकऱ्या, कर देणाऱ्या व संस्थानातील लोकांना द्याव्यात, जबाबदार शासन पध्दती अंमलात आणावी अशा मागण्या मानपत्रात केल्या होत्या. मानपत्र स्विकारून तडजोडीची भूमिका महाराणी साहेबांनी स्विकारली.[२३]

दि. १०-९-१९४२ रोजी कार्यकारी मंडळाची बैठक भरली. त्या बैठकीत खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. (१) श्रीमंत छत्रपतींच्या अधिपत्याखाली लोकांना संपूर्ण जबाबदार अशी राज्यपध्दती कोल्हापूर संस्थानात स्थापन करावी. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे अ. भा. कॉंग्रेस कमिटीने जो ठराव मंजूर केला तो प्रजा परिषदेला मान्य आहे.

(२) ९ ऑगस्ट १९४२ पासून देशात सर्वत्र सुरू झालेल्या स्वातंत्र्याच्या प्रतिकारात्मक लढ्यात ज्या स्वातंत्र्य वीरांनी बलीदान केले, त्या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

(३) संस्थानात प्रभावी संघटना करण्यासाठी पुढील कार्यक्रम आखला.

(१) प्रजा परिषदेच्या घटनेप्रमाणे परिषदेचे प्राथमिक सभासद नोंदवून गांव, तालुका, शहर, व इलाखा इ. समित्या स्थापन करणे.

(२) शेतकरी व कामकरी संघ स्थापन करणे.

(३) सेवादले स्थापन करणे. विद्यार्थी संघटना स्थापन करणे, अस्पृश्यता निवारण व विधायक कार्यक्रमाचा अवलंब करणे.

(४) कोल्हापूर नगर पालिका, इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुका लढविणे. वरीलप्रमाणे ठराव मंजूर करून प्रजा परिषदेने १२ ऑगस्टची आपली मागणी कायम असल्याचे स्पष्ट केले.[२४]

कोल्हापूर सभाबंदी हुकूमाचा भंग --

दि. १६ ऑगस्ट १९४२ रोजी कोल्हापूर शहरातून प्रजा परिषदेने एक भव्य मिरवणुक काढली व तिचे खासबागेत जाहीर सभेत रुपांतर झाले. यावेळी भुर्के यांनी भाषण केले. दरबाराच्या सभा, मिरवणुक बंदी व कायद्याचा त्यांनी निषेध केला. राष्ट्रगीत चालू असताना खानब साद्री व लाठीधारी पोलीस सभास्थानी आले. लोक इतस्तत: पळू लागले. दगड फेक झाली. पोलीसांनी लाठी हल्ला चालू केला. मे. अमृत भोसले जखमी झाले, मे. शं. बा. भोसले यांना दवाखान्यात न्यावे लागले. लाठी हल्ल्यात बिंदू कुलकर्णी नावाचा मुलगा ठार झाला. वरील प्रकारामुळे कोल्हापरात हरताळ पाळण्यात आला. [२५]

गेल्या वर्षी ऑगस्ट मध्ये विनाचौकशी स्थानबध्द करुन ठेवलेले प्रजा परिषदेचे नेते श्री माधवराव बागल यांची दि. १ मे १९४३ रोजी पंतप्रधान ना. पेरी यांनी स्वत: पन्हाळ्याला जाऊन मुक्तता केली व त्यांना घरी पोहोचविले. त्यानंतर प्रजापरिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा भरुन कांही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. प्रजा परिषद कार्यकारी मंडळाच्या तुरुंगात असलेल्या सभासदानाही सभेस उपस्थित राहाण्याची परवानगी मिळाली. सभा व्यवस्थीत पार पडली. दरबार व प्रजा परिषद यांच्यात तडजोड होण्याची चिन्हे दिसू लागली. [२६]

प्रजा परिषदेचा बहिष्कार ।

कोल्हापूरच्या दरबाराने १९४२ मध्ये असंसदीय विधी मंडळाची घटना जाहीर केली. ही घटना प्रतिगामी स्वरुपाची होती. दरबाराने १३ मे १९४३ ला विधीमंडळाच्या निवडणूका घेण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करणारे पत्रक बागलांनी प्रसिध्द केले. हा बहिष्काराचा कार्यक्रम लोकापर्यन्त पोहोचावा यासाठी त्यांनी इचलकरंजी, शिरोळ, रायबाग, चिंचली, गडहिंग्लज, खडकलाट या ठिकाणी जाहीर सभा होऊन आपली भुमिका मतदारांना समजाकून सांगितली. निवडणुकीचा दिवस बहिष्कार दिन म्हणून पाळून जनजागृती निर्माण करण्यात आली. बहिष्काराचा कार्यक्रम मोठ्या

प्रमाणात यशस्वी झाला.

तथापि या बहिष्कारा संबंधी पुढारी ने वेगळी भूमिका मांडली. सर्वांना मत स्वातंत्र्याचा अधिकार आहे. प्रजा परिषदेने बहिष्कार पुकारला म्हणून तो सर्वांनीच पुकारावा हा दुराग्रह, हुकूमशाहीचे समर्थन करणाऱ्या पक्षाला शोभण्यासारखा आहे. प्रजा परिषदेने आपला बहिष्कार यशस्वी करण्याकरिता मतदारांचा खुशाल मत प्रचार करावा. पण आम्हीच तेव्हढे जनतेचे प्रतिनिधी हा दुराग्रह सोडावा हा सर्व सामान्य जनतेच्या मताचा अभिप्राय आहे असे प्रतिपादन पुढारी ने आपल्या दि.५ मे १९४४ च्या अग्रलेखात केले आहे.[२७]

विद्यार्थी व प्रजा परिषद यांचे संबंध प्रेमाचे रहावेत, त्यांचा दृष्टीकोन प्रजा परिषदेस समजावा व उभय पक्षी सहकार्य वाढावे या हेतूने प्रजा परिषदेचे कार्याध्यक्ष माधवराव बागल यांनी आज्ञापत्र काढुन प्रजा परिषद कार्यकारी मंडळावर दोन विद्यार्थी कार्यकर्त्यांची नियुक्ती केली.

कोल्हापूर संस्थान प्रजा परिषदेचे काम सारखे वाढत चालले होते. त्यांतील कांही, थोर कार्यकर्ते विशेष अडचणीमुळे दूर झाले होते. दि. २ ऑक्टोबर १९४५ पासून ते येईपर्यन्त त्यांचे जागी, त्यांच्या कार्याचा बोजा व्हावा म्हणून श्री विरक्त मठ व श्री बराले यांची नेमणूक करण्यात आली. श्री. देशपांडे प्रकृती अस्वास्थ्यतेमुळे सेक्रेटरीचे काम करु शकत नव्हते. ते आपली जबाबदारी स्वीकारी पर्यन्त त्याचे काम श्री. विरक्त मठ यांनी केले व बराले यांनी जॉ. सेक्रेटरी म्हणून काम केले.[२८]

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा दिनांक २९ जानेवारी १९४६ रोजी सायंकाळी ६ वा. श्री श्रेष्ठी वकील यांच्या माडीवर भरुन खालील ठराव पास करणेत आले (१) श्री कोळवणाकर यांचे निधनाबद्दल दुःख प्रदर्शन करण्यात येऊन व १५ मिनिटे बैठक तहकूब केली. (२) प्रजापरिषदेचा

आठवा वाढ दिवस ता.६ फेब्रुवारी १९४६ इ. रोजी कोल्हापूर शहर व इलाख्यातील लहान मोठी गावे यामध्ये अत्यंत उत्साहाने साजरा करावा. (३) प्रजा परिषदेसाठी जास्तीजास्त सभासद वाढविणे, गांव कमिट्या वगैरे स्थापन करून प्रजापरिषदेची घटना संपूर्णपणे मार्चच्या आंत अमलात आणण्यासाठी श्री.गोविंदराव उपळेकर यांच्या नेतृत्वाखाली श्री.कारखानीस वकील, श्री.अनंतराव वडगावकर, माधवराव भोसले यांची कमिटी निवडण्यात आली. (४) श्री सुभाषचंद्र बोस यांचे जयंती निमित्त मुंबई येथे निघालेल्या मिरवणुकीवर गोळीबार केल्याबद्दल सरकारचा निषेध करण्यात आला. तसेच झालेल्या प्रकारची नि:पक्षपाती चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली. (५) कॉंग्रेसचे खासदार श्री.मावळंकर हे मध्यवर्ती विधीमंडळाच्या अध्यक्षपदी निवडुन आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. (६) महाराष्ट्र व कर्नाटक येथे आगामी प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुका यशस्वीपणे लढविण्याची तयारी येथील कॉंग्रेस कमिट्या करीत आहेत, त्या कामी प्रजापरिषद त्यांना जरूर ती सर्व मदत करण्यास तयार आहे. (७) कोल्हापूर येथे कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेच्या कार्यालयाची स्वतंत्र इमारत बांधणे जरूरीचे असल्याने जागा मिळण्याकरिता कार्याध्यक्षांनी नगराध्यक्षाकडे रितसर मागणी करावी. [२९]

कोल्हापूर दरबार आणि प्रजा परिषद यांचे दुष्काळ निवारण्याच्या प्रश्नावर संपूर्ण सहकार्य करण्याचा निर्णय दि. २६ मार्च १९४६ रोजी पंतप्रधान ना.बागवे, ना.गुलाबराव देशमुख ,ना.भास्करराव जाधव, श्री.माधवराव बागल, प्रभाकरपंत कोरगावकर, रा.तु.बगाडे, म.दु.श्रेष्ठी आणि बापूसाहेब राजाज्ञा यांच्या बैठकीत घेण्यात आल्या.

या बैठकीत दुष्काळी भागासाठी दरबार, प्रजापरिषद आणि इतर यांची एक स्वतंत्र समिती नेमून दुष्काळ निवारण्याचे सर्व अधिकार त्या समितीस देण्याची सूचना प्रजा परिषदे तर्फे करण्यात आली. मात्र कायदेशीर अडचणीमुळे सूचना मान्य करण्यात आली नाही. प्रजा परिषदेने एक आपली समिती नेमावी

व तिच्यामार्फत आपल्या सर्व सूचना दुष्काळी अधिकाऱ्याकडे पाठवाव्यात, दुष्काळ अधिकाऱ्याने सदर सूचना वरिष्ठाकडे पाठवून ज्या सूचना मंजूर होतील त्याची अमंलबजावणी करावी श्री.म.सि.विरक्त मठ यांनी गोडची येथे सुरु केलेल्या उपवासाचा प्रश्नहि वरील बैठकीत चर्चेस निघाला होता पण त्यांचा उपवास हा प्रजा परिषदेचे जनरल सेक्रेटरी या नात्याने सुरु केलेला नसून तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे असे प्रजा परिषदेच्या वतीने सांगण्यात आले.[३०]

श्री माधवराव बागल यांचा राजीनामा कोल्हापूर संस्थान प्रजा परिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा दि.१ व २ ऑगस्ट १९४६ रोजी सकाळी भरुन बरेच ठराव पास झाले. सिव्हिल बोर्डाचे अध्यक्ष श्री.माधवराव बागल यांनी दिलेल्या राजिनाम्यावर बरीच खडाजंगी होऊन कार्यकारी मंडळाने सिव्हिल बोर्डाच्या अन्यायावर पांघरुन घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष श्री.माधवराव बागल यांनी कार्याध्यक्ष पदाचा राजिनामा दिला. त्यामुळे प्रजापरिषदेत बरीच खळबळ उडाली आहे.[३१]

<u>प्रजा परिषदेचे तिसरे अधिवेशन --</u>

पुढारी कार ग.गो.जाधव यांनी आपल्या अग्रलेखात प्रजा परिषदेचे तिसऱ्या अधिवेशना बद्दल सविस्तर चर्चा केली आहे. गारगोटी येथे दि.२४-२५ मे १९४७ रोजी कोल्हापूर संस्थान प्रजा परिषदेचे तिसरे अधिवेशन दे.म.काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली व प्रांताध्यक्ष केशवराव जेधे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या अधिवेशनात प्रजा परिषदेतील अंतर्गत गटात एकजूट घडवून आणण्याचे कामी गाडगीळ व जेधे यांनी केलेले प्रयत्न यशस्वी झाले. प्रजा परिषदेतील हि दुही नाहीसी होईल तर प्रजा परिषदेची ताकद वाढेल. व जनतेच्या हातात जास्तीजास्त सत्ता येईल असे मत ग.गो.जाधवांनी व्यक्त केले. माधवराव बागलाना गारगोटी अधिवेशनाने पुन्हा प्रजा परिषदेचे कार्याध्यक्ष केले. प्रजा परिषदेच्या स्थापनेपासूनच नव्हे तर त्याच्याही आधीपासून माधवराव

बागलांनी शेतकरी - कष्टकरी जनतेच्या हितासाठी आपला देह झिजविला आहे. प्रजा परिषदेने या अधिवेशनांत प्रजासत्ताक राज्याची घोषणा केली. श्रीमंत महाराजांचे सल्लागार पंतप्रधान यांच्यावर टिका करण्यात आली. प्रजा परिषदेने या अधिवेशनात तूर्त व ताबडतोबची मागणी म्हणून लोक प्रतिनिधिक संपूर्ण व सर्वस्वी जबाबदार हंगामी सरकार स्थापन करावे म्हणून व्यक्त केलेली आकांक्षा श्रीमंत छत्रपतींच्या प्रगतीवर धोरणामुळे सफल होईल असा आशावाद सदर अग्रलेखात व्यक्त केला आहे.[३२]

श्री माधवराव बागलांनी `असोसिएटेड प्रेस ऑफ इंडिया` ला दिलेल्या मुलाखतीत कोल्हापूर संस्थानच्या अधिकाऱ्यांनी जनतेच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर त्याना राज्य कारभार करणे अशक्य होईल असा इशारा देऊन प्रजा परिषदेवर जातीयतेचा केलेला आरोप खोडसाळपणाचा असून आमच्या मध्ये फूट पाडण्याचा तो एक टाकलेला डाव आहे असे सांगितले.

घटना सुधारणेवर टिका करताना श्री बागल म्हणाले की नवीन मंत्रिमंडळ जनतेचे प्रतिनिधिक नाही. असेंब्लीतूनही जास्त कार्यक्षम व लायक अशा सभासदांची मंत्री पदासाठी निवड करता आली असती तर बरे झाले असते. इंग्लंडच्या राजाप्रमाणे श्री छत्रपतींचे स्थान रूपदशीर म्हणून राहावे व प्रजासत्ताक राज्य स्थापावे, जहागीरीचे विसर्जन करावे, सहकारी संस्थाची वाढ, खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यावर नियंत्रण इ. गोष्टीही कराव्यात असे मत श्री माधवराव बागल यांनी व्यक्त केले.

श्री बागल म्हणाले नवीन घटनेनुसार होणाऱ्या विधिमंडळाच्या आगामी निवडणुकीवर प्रजा परिषद बहुधा बहिष्काराचा निर्णय घेईल. मुलाखतीच्या शेवटी बागल म्हणाले की प्रजा परिषदेचे मंत्री नेमले तर त्यांची निवड लायकीनुसार केली जाईल.[३३]

घटना निषेध व छत्रपतींचे आश्वासन --

प्रजा परिषदेने २३ जून १९४७ हा घटना निषेध दिन म्हणून पाळण्याचे ठरविले. तथापि ता.२२ जून १९४७ रोजी प्रजा परिषदेशी विचार विनिमय होऊन घटनेत दुरुस्ती व बदल करण्यात येईल असे आश्वासन छत्रपती कडून मिळाले. त्यामुळे वाटाघाटीचा मार्ग मोकळा झाला. निव्वळ निषेध ,हरताळ हे प्रजा परिषदेचे ध्येय नव्हते.घटना बदलून घेणे, हा उद्देश जो सभेने साधावयाचा तो भेटीने साधला गेला. वाटाघाटीचा मार्ग मोकळा झाला यात प्रजा परिषदेला अपमानकारक असे काहीही झाले नाही. बोलणी करण्यासाठी कार्यकारी मंडळाशी किंवा त्यांनी नेमून दिलेल्या व्यक्तींशी वाटाघाटी कराव्या लागतील हे श्री बागल यांनी महाराजांना स्पष्टपणे सांगितले.[३४]

प्रजा परिषदेतील वर्गकलह --

१९४७ साली संस्थानची सत्ता हाती येताच दुर्दैवाने कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेत दुफळी निर्माण झाली. प्रजा परिषदेच्या कार्यकर्त्यात दोन गट पडले. मंत्री मंडळातील खाते वाटपाचे निमित्त या दुफळीस कारणभूत ठरले. प्रजापरिषदेतील एका गटाचे नेतृत्व माधवराव बागल करित होते,त्यांच्या गटात शेतकरी कष्टकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ग्रामीण कार्यकर्ते यांचा अधिक भरणा होता.दुसऱ्या गटाचे नेतृत्व रत्नाप्पा कुंभार करित होते. शहरी भागातील व्यापारी,उद्योगपती,मध्यवर्ती प्रजा परिषदेतील फटाफुटीस जातीय रंग ही असल्याचे दिसून येते. मराठे व मराठेत्तर अशा दोन गटात प्रजा परिषद दुभंगली होती. मराठेत्तर गटाचे नेतृत्व रत्नाप्पा कुंभार करित असल्याचे दिसून येते.

' पुढारी ' कार ग.गो.जाधव यांनी ' पुढारी ' च्या दि.१९ नोव्हेंबर १९४७ च्या अग्रलेखात प्रजा परिषदेच्या वर्गकलहाबाबत स्पष्ट मत व्यक्त केले आहे. प्रजा परिषद कार्यकारी मंडळात नियोजित मंत्र्यांच्या खातेवाटणीबाबत तीव्र स्वरुपाचे मतभेद झाल्याने श्री.रत्नाप्पा कुंभार, श्रेष्ठी,बगाडे,प्रभृती आठ

सदस्यांनी राजिनामे दिले. दरबार व प्रजा परिषद यांच्यात जी मूळ तडजोड झाली. तिच्यांत श्री.रत्नाप्पा यांचा सहभाग नव्हता. मंत्र्यांची निवड व खाते वाटप या बाबतींत सर्व अधिकार खुद्द कार्यकारिणीनेच कार्याध्यक्षाना दिले होते. रत्नाप्पा कुंभार गटांना तो अधिकार मान्य नव्हता. भांडवलवाल्यांच्या व व्यापाऱ्यांच्या दृष्टीने महत्वाची अशी पुरवठा व पोलीस ही दोन खाती रत्नाप्पा कुंभाराना हवी होती. कायदा व सुव्यवस्था खाते चीफ मिनिस्टरकडे, पुरवठा खाते रत्नाप्पाकडे असावे व अर्थ खाते श्री.श्रेष्ठीनी संभाळावे असा कार्याध्यक्षांनी आदेश दिला होता. परंतु पुरवठा व पोलीस हीच खाती रत्नापांना हवी होती.खाती वाटपात वाद झाल्याने कार्याध्यक्षांनी मंत्री - मंडळातून आपले नाव काढून घेतले. बहुमताने निर्णय घ्यावा . सायंकाळी ७।। वाजता श्री.बराळे यांचे भाषण चालू असता दिवा आणण्याकरिता गेलेला कुंभार गट राजीनामा घेऊन आला व तो सभेत टाकून निघून गेले. परंतु तो वर्गकलह होता. बागल गट हा शेतकऱ्या,कामकऱ्यांचा आणि कुंभार गट हा भांडवलवाल्यांचा प्रतिक आहे. लोकशाहीचा निर्णय बागलानी मानला नाही असे म्हणणाऱ्यांनी श्री रत्नाप्पा यांची मध्यवर्ती व कार्यकारीणीवरील निवड कायदेशीर व लोकशाहीला धरून आहे काय याचा जाब जनतेपुढे द्यावा म्हणजे बऱ्याच गोष्टीवर उजेड पडेल. कुंभार गटाने राजीनामे देऊन प्रजा परिषदेला अडचणीत टाकले आहे व दरबाराचे हात बळकट केले आहेत असे मत ग.गो.जाधव यांनी व्यक्त केले.[३५]

दि.१९ नोव्हेंबर १९४७ रोजी लोकमंत्री श्री वसंतराव बागल,श्री.डी.एस. खांडेकर,श्री.त्र्यं.सी.कारखानीस व श्री.नारायणराव सरनाईक या लोक मंत्र्याचा शपथ विधी नवीन राजवाड्यावर श्रीमंत छत्रपती शहाजी महाराज यांचे समोर झाला. श्रीमंत छत्रपती महाराज व माधवराव बागल यांची अपूर्व भाषणे झाली.

पंतप्रधान ना.दादासाहेब सुर्वे, चीफ सेक्रेटरी गुलाबराव देशमुख, ना. सर्जेराव माने, ना.बॅ.अेस.अेन.माने, ना.एस.आर.जाधव व प्रजा परिषदेचे

कार्यकर्ते,पत्रकार,वार्ताहार हजर होते. खाते वाटणी खालीलप्रमाणे झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री वसंतराव बागल | - | मुख्यमंत्री ( गृहमंत्री ) |
| २) | श्री डी.एस.खांडेकर | - | महसूल मंत्री |
| ३) | श्री त्र्यं.सी.कारखानीस | - | अर्थ मंत्री |
| ४) | श्री नारायणराव सरनाईक | - | पुरवठा मंत्री |
| ५) | बॅ.एस.एन.माने | - | शिक्षण मंत्री |
| ६) | श्री एस.आर.जाधव | - | ग्रामसुधारणा मंत्री |

पहिल्या बैठकीतील निर्णय --

श्रीमंत छत्रपती महाराज यांनी जबाबदार राज्यपध्दती सुरु करुन नवीन मंत्र्यांचे हंगामी सरकार बनविले, याबद्दल छत्रपती शहाजी महाराज यांचे प्रथम अभिनंदन करण्यात आले. १९३८ पासून असलेली राजकीय स्वरुपाची वॉरंटे रद्द करण्यात येत आहेत. सामुदायिक व व्यक्तीविषय राजकीय दंड परत करण्यात येतील. राजकीय खटले रद्द करण्यात आले. राजकिय संघटनावरील बंदी तात्काळ उठविण्यात येत आहे असे निर्णय या नवीन मंत्री मंडळाने घेतले.[३६]

प्रजा परिषद कार्यकारी मंडळाची बैठक चालू असताना दि.३० जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत राष्ट्रपिता महात्मा गांधींचा खून झाला. या खूनामुळे लोकक्षोभ होऊन महाराष्ट्रात जाळपोळ सुरु झाली. शहरे व ग्रामीण भागात ब्राह्मण समाजाचे जिवीत आणि वित्त धोक्यात आले हे लोण कोल्हापूर संस्थानात पसरले. कोल्हापूर हे तर ब्राह्मणेत्तर चळवळीचे प्रमुख केन्द्र होते. त्यामुळे जाळपोळ मोठ्या प्रमाणात सुरु झाली. श्री.माधवराव व वसंतराव या बागल बंधू यांनी पोलीस बळाचा वापर न करता अहिंसात्मक मार्गाने दंगल आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. माधवराव गांधीजीचे कायावाचामने उपासक व अहिंसा तत्वज्ञानाचे कट्टर अभिमानी होते. पोलीसानी केलेला गोळीबार आणि त्यामध्ये पडलेले बळी पाहून ते अस्वस्थ झाले आणि स्वत:च्या जीवावर उदार होऊन अहिंसात्मक मार्गानी दंगल थांबविण्यासाठी त्यानी प्रयत्न केला. परंतु त्यांना दंगल

थांबविण्यात यश आले नाही. लोकक्षोभ इतका प्रचंड होता की, 'प्रभाकर' स्टुडिओ लोकांनी पेटवून दिला. माधवराव त्या क्रोधाग्नीने पेटलेल्या जमावाला जवळच उभ्या असणाऱ्या एका शेवरलेट गाडीवर चढून तो स्टुडिओ न जाळण्या-संबंधी अगतिक होऊन विनवण्या करीत होते. परंतु सुडाच्या भावनेने अविचारी बनलेल्या बेभान जमावाला ते आवरू शकले नाहीत. हा स्टुडिओ भालजी पेंढारकरांच्या सारख्या शिवभक्ताचा होता. केवळ आर.एस.एस.या म.गांधींच्या विरोधी असणाऱ्या संघटनेशी त्यांचा संबंध होता. म्हणून स्टुडिओ बेचिराख करण्यात आला.केन्द्रिय नेत्यांनी माधवरावांना जबाबदार धरले. या संधीचा फायदा घेऊन रत्नाप्पांनी ६ मार्च १९४८ रोजी २२ पानी टाईप केलेले एक प्रदीर्घ पत्र केन्द्रिय मंत्र्यांना लिहून त्या मध्ये माधवराव व वसंतराव बागल हेच दंगलीला जबाबदार असून त्याचे मंत्रिमंडळ रद्द करावे, त्याच प्रमाणे तालीम संघावर बंदी घालावी अशी मागणी केली. त्यामुळे संस्थान विलिनीकरणाला विरोध करणारा पुढारी अशी माधवराव बागल यांची प्रतिमा केन्द्रिय कॉंग्रेस नेत्यामध्ये तयार झाली. व्ही.पी.मेनन व कॅ. व्ही.नंजाप्पा सारख्या सनदी अधिकाऱ्यांनी त्यांना खूप अपमानकारक वागणूक दिली.[३७]

कोयाजी समिती अहवाल --

कोल्हापूरचे प्रशासक नंजाप्पा यांनी गांधी हत्येनंतर झालेल्या दंगलीची चौकशी करण्यासाठी 'कोयाजी समिती' नियुक्त केली. या समितीने १७-६-४८ ते ७-९-१९४८ या कालावधीत काम पूर्ण करून आपला अहवाल सादर केला. यात मंत्री मंडळातील दरबार नियुक्त मंत्री सर्जेराव माने, बॅ.माने व जाधव हे तीन जन वगळता इतर प्रजा परिषदेच्या चार मंत्र्यानी दंगलीस प्रोत्साहन देवून गुंडाच्या गुन्ह्याकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष केले असे म्हणून त्यांना दोषी ठरविले. त्याच प्रमाणे श्री बागलानी ब्राह्मण विरोधी भावना भडकावल्यामुळे गांधी वधानंतरच्या दंगलीत फक्त ब्राह्मणांचीच हानी झाली असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

मध्यवर्ती सरकार संस्थान विलीनीकरणाचा निर्णय घेईल असे पूर्वीच वाटत होते. कारण मार्च १९४४ मध्ये संस्थान सचिव श्री. व्ही.पी.मेनन कोल्हापूरला येऊन गेले होते. त्यांनी चौकशी करुन बागल मंत्री मंडळ बरखास्त करण्यात येईल व संस्थानला प्रशासक नियुक्त केला जाईल असे जाहीर केले होते. कोयाजी अहवालात दंगलीचे खापर बागलावर फोडण्यात आले होते.[४८]

प्रजा परिषदेचे पत्रक --

दि. २२ जानेवारी १९४९ रोजी कोल्हापूर संस्थान प्रजा परिषद चे कार्याध्यक्ष माधवराव बागल यांनी खालील पत्रक काढले " संस्थानाबाबत हिन्द सरकारचे आतापर्यन्तचे धोरण लोकामतावर विलिनीकरणाचा प्रश्न अवलंबून ठेवण्याचे होते. प्रजा परिषद चे ही आतापर्यन्तचे धोरण त्यास अनुसरुनच होते पण आता सरदार पटेल यांनी बार्डोली येथे केलेल्या भाषणावरुन सर्व संस्थानचे हिंद राष्ट्रात विलीन करुन घेण्याचे धोरण व्यक्त झाले आहे. लोकशाहीला धरुन हे झाले नाही. म्हणूनच प्रजा परिषदेला खेद होत आहे. प्रजा परिषदेचे धोरण सरंजामशाही टिकविण्याचे कधीच नव्हते व नाही. मत भेद जो आहे तो कार्यपध्दतीत होता. आता जे होत आहे ते राष्ट्राच्या ऐक्याच्या व संवर्धताच्या दृष्टीने इष्ट व आवश्यक असल्याने प्रजा परिषद साधनाबाबत मतभेद असूनहि हिंद सरकारशी आपुलकीचे व सहकार्याचे धोरण स्विकारील. या प्रसंगी प्रजा परिषदेच्या राष्ट्रीय वृत्तीची जाणीव ठेवून जनता वागेल असा मला विश्वास आहे.[३९]

कोल्हापूरचे विलिनीकरण --

दि. ३१ जानेवारी १९४९ रोजी छत्रपती शहाजी महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या विलीनीकरण्यास मान्यता दिली. त्यानंतर एका आठवड्याने ते खाजगी तनख्याबाबत वाटाघाटी करण्यासाठी दिल्लीला जाणार होते.

" पुढारी " कार ग.गो.जाधव यांनी दि. २ फेब्रुवारी १९४९ च्या

अग्रलेखात कोल्हापूरच्या विलिनीकरणाविषयी मत मोकळा अभिप्राय व्यक्त केला आहे. छत्रपति शहाजी यांच्या अनुमतीने कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलिन झाल्याची घोषणा भारत सरकारच्या संस्थानी खात्याने १ फेब्रुवारी १९४९ रोजी केली. स्वातंत्र्य लढ्यात कोल्हापूरने जसा हिरीरीने भाग घेतला तसाच आता देशाच्या राजकारणात घ्यावा. भारत सरकार व लोकशाही यांच्यावरील आपली निष्ठा अढळ राखून सामान्य जनतेचे हित आपल्याला साधावयाचे आहे. म्हणूनच झालेले वाद विसरून व देशाच्या उज्ज्वल भवितव्यावर नजर ठेवून कोल्हापूरच्या विलिनीकरणाच्या घटनेचे पुढारीने स्वागत केले. भारत सरकार व श्रीमंत छत्रपति महाराज यांच्या उदार धोरणाबद्दल व देशहितैषी निर्णयाबद्दल त्यांना 'पुढारी' ने धन्यवाद दिले.[४०]

कोल्हापुरातील काही मान्यवर व्यक्तींनी एक पत्रक काढून कोल्हापूरचे विलीनीकरण झाल्याची संस्थानी खात्याने केलेली घोषणा स्वागतार्ह व समाधानकारक असल्याचे मत व्यक्त केले. त्यांनी पुढील प्रमाणे एक ठराव संमत केला. 'श्रीमंत छत्रपती शहाजी महाराज यांनी विलीनीकरणास संमती दिली याबद्दल त्यांचेही आम्ही मनपूर्वक अभिनंदन करतो. आपला देश एकछत्री व एकसंधी व्हावा व लोकशाहीला भरपूर वाव मिळावा म्हणून संस्थानी जनतेने या घटनेचे आनंदाने स्वागत करावे हे स्वाभाविक आहे. कोल्हापूर संस्थानची सर्व प्रजा हिंद सरकारशी एकनिष्ठ राहिल व देशसेवेचा आपल्या शक्तीप्रमाणे वाटा उचलतील. संस्थानच्या विलीनीकरणाबद्दल आम्ही पुन्हा एकदा हिंद सरकारचा विशेषतः उपपंतप्रधान सरदार पटेल व श्रीमंत छत्रपती महाराज यांचे मनपूर्वक अभिनंदन' सदर ठरावास संमती देणाऱ्यांत व्ही.टी.पाटील, ए.के.पवार, ग.गो.जाधव ( सं.पुढारी ), बी.एस.इंदूलकर, एल.बी.पिसे, के.व्ही.राणे, आर.बी.पाटील, सौ. निर्मला यादव, ना.आ.नांद्रेकर, ध.दे.वर्धमाने, व्ही.जी.करमरकर, गणपतराव पाध्ये, ( सं.गर्जना ) के.बी.देसाई, रा.बा.जाधव ( सं.प्रजा ) पा.शि.उपळेकर, शं.बा.भोसले ( सं.लोकसेवक ) एस.व्ही.लिंग्रस, आ.बा.पाटील( सं.सत्यवादी ) बॅ.एस.एन.माने, सर्जेराव पाटील ( सं.सत्यवादी ), रामराव शिंदे, एन.जी.देव, पी.एच.पाटील,

शिवगोंडा मलगोंडा पाटील, नारायण भाऊ गोलंडे, डी.टी.चिवटे, दि.य. भूमकर, शंकरराव प्रभावळे इत्यादी मंडळी होती.[४१]

यानंतर कोल्हापूर प्रजा परिषदेची विलिनीकरणासंबंधी भूमिका स्पष्ट करण्याकरिता पन्हाळ्यास प्रजा परिषदेचे अधिवेशन घेतले गेले. शंकरराव मोरे अध्यक्ष व उद्घाटक दे.भ.केशवराव जेधे होते. त्यामुळे या परिषदेला लोकांनी खूप गर्दी केली होती. डॉ.पट्टाभी ,बाळासाहेब खेर, काकासाहेब गाडगीळ या प्रजा परिषदेच्या पूर्वीच्या अध्यक्षांच्या धोरणानुसारच प्रजा परिषदेचे काम चालू होते. रत्नाप्पा कुंभारानां हवे ते मंत्रीपद मिळत नाही म्हणून ते विलिनीकरणास पाठींबा देत होते असे माधवराव बागलांचे मत होते. शंकरराव मोरे यांनी बुध्दीचातुर्याने अध्यक्षीय भाषण केले ते म्हणतात राज्य कोणाचे हवे ते ठरविण्याचा अधिकार जनतेला आहे. काश्मीरने कोठे सामील व्हावे हे सार्वमताने ठरविले जावे असे हिन्द सरकार म्हणते, जुनागढ मध्ये सार्वमत घेतले गेले तर मग त्याला अपवाद कोल्हापूर का ? अधिवेशनाने पुन्हा एकदा संस्थान विलिनीकरणाला लोकमत तितके अनकूल नव्हते हे सिध्द झाले परंतु त्याचा उपयोग झाला नाही.[४२]

<u>कोल्हापूर संस्थान प्रजा परिषदेचे विसर्जन --</u>

संस्थान विलीनीकरणाच्या घोषणेनंतर दि.१९-२-४९ रोजी माधवराव बागल यांचे बिंदू चौकात भाषण झाले. त्यांनी प्रजा परिषदेच्या विसर्जनाची घोषणा करुन आपल्या कार्यकर्त्यांना शेतकरी कामगार पक्षात जाण्याचा आदेश दिला. प्रजा परिषदेचे राजकीय कार्य घटनेप्रमाणे संपल्यामुळे तिचे विसर्जन करणे भाग होते. परंतु प्रजा परिषदेचे विसर्जन म्हणजे कार्य त्याग नव्हे असे उद्गार दि.१९-२-१९४९ रोजी सायंकाळी बिंदू चौकात झालेल्या विराट सभेत माधवराव बागल यांनी काढले ते पुढे म्हणाले की संयुक्त महाराष्ट्र हा बहुजन समाजाच्या अस्तीत्वाचा प्रश्न असल्यामुळे तो घसास लावण्याची उत्कंठा शेतकरी कामगार पक्षात विशेष आहे. प्रजा परिषदेच्या कार्यकर्त्यांनी

शेतकरी कामगार पक्षास मिळावे. पण व्यक्तीश: या पक्षा बाहेर राहूनच सर्व ते सहाय्य त्या पक्षाला करण्याचे ठरविले आहे. या पक्षाची सेवा माझ्या हातून जास्तीजास्त होईल असा मला विश्वास वाटतो.' त्याच भाषणात त्यानी कोल्हापूरची राजकीय परंपरा व महत्व लक्षात घेऊन कोल्हापूर ,सातारा, रत्नागिरी, सांगली व बेळगाव या जिल्ह्याचा एक प्रशासकीय विभाग (डिव्हिजन ) करावा असेही सांगितले. या सभेस सातारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते श्री. व्ही. एन. पाटील हजर होते.[४३]

१ मार्च १९४९ रोजी कोल्हापूर संस्थानचे विलिनीकरण होणार म्हणून आम जनता आनंदात होती. शेतकरी कामगार पक्षाचे नेते श्री.शंकरराव मोरे, श्री केशवराव जेधे, श्री.नाना पाटील, आमदार तुळशीदास जाधव, व काकासाहेब वाघ यांच्यावर कोल्हापूर संस्थानात येण्यास घातलेली बंदी ही सरकारने रद्द केली व इचलकरंजी शहरात १४४ कलमान्वये घातलेली सभा, मिरवणूकीवरील बंदीही रद्द करण्यात आली. ता. १ मार्च १९४९ रोजी होणाऱ्या संस्थानच्या विलिनी-करणाच्या आनंदाप्रीत्यर्थ ७५ कैद्यांची मुक्तता व पावणे दोनशे कैद्यांची शिक्षा कमी करण्यात आली अशा प्रकारे संस्थान विलिनीकरणाच्या आनंदात सरकारने भर घातली.[४४]

विलिनीकरण प्रसंगी भारताचे पंतप्रधान व जवाहरलाल नेहरू व मुंबई प्रांताचे गव्हर्नर ना. राजा महाराजासिंग यांनी तारेने शुभसंदेश पाठवून करवीरच्या प्रजाजनांचे अभिष्ट चिंतले होते.[४५]

कोल्हापूर संस्थानच्या विलीनीकरणाच्या सोहळ्याचे सविस्तर वर्णन दि. २ मार्च १९४९ च्या पुढारीच्या अग्रलेखात आढळते. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे मुंबई राज्याचे पंतप्रधान ना. बाळासाहेब खेर हे होते. भारत सरकारच्या संस्थानी खात्याचे सचिव श्री. व्ही. पी. मेनन व मुंबई राज्याचे मुख्य सचिव श्री. एम. डी. भट हे दोघे या सोहळ्यास खास उपस्थित होते. विलीनीकरणाचा सोहळा दिनांक १ मार्च १९४९ रोजी खासबाग मैदानावर पार पाडला. त्या प्रसंगी केलेल्या

भाषणात ना.खेरांनी पुढील उद्गार काढले " ज्या शिवछत्रपतींनी आम्हाला जिवंत ठेवले, इतकेच नव्हे तर आम्हाला चिरंजीव केले त्या संदेशात त्यांनी आपणा सर्वांस हिंद सरकारशी एकनिष्ठ राहण्याबद्दल सांगितले आहे. आपण हिंद संघ राज्याचे झाला आहात आणि महाराजांचा संदेश आपण पाळावा, असेच मी या प्रसंगी सांगतो. हिंद सरकार बलवान व समर्थ करण्यास आपण याच परंपरेचे पालन करावे अशी मी इच्छा बाळगतो" ते पुढे म्हणाले की " आज कोल्हापूरला खरे खुरे स्वतंत्र झाले आहे. सात वर्षांनंतर या समारंभास येण्याचे मला सौभाग्य लाभले आहे, ही खरोखरच भाग्याची गोष्ट आहे. १ मार्च पासून आपण हिंदी जनतेचा एक भाग झाला आहात, तुमच्या शिक्षणाची अधिक उन्नती आम्ही करु. राधानगरी योजना सत्वर पुरी केली जाईल. सर्वांचे उन्नती आम्ही करु, सर्वांचे आरोग्य, सर्वांचे शिक्षण याची काळजी घेतली जाईल, सर्वांना समतेने वागविण्याचा निर्णय सरकारने घेतला.

आजपासून कोल्हापूर संस्थानचा कारभार छत्रपती महाराजांनी केलेल्या करारानुसार मुंबई सरकारकडे जात आहे व श्री शिव छत्रपतींना आदरांजली वाहिली. श्री शिवछत्रपती हे हिंदू भूमिच्या प्रसिध्द सुपुत्रांपैकी एक असून, त्यांच्या अंता नंतरही आज २५० वर्षे श्री शिवछत्रपतींचा संदेश आम जनतेस नव चैतन्य देत आहे. शहाजी महाराज हे मुत्सद्दी असून त्यांनी काळाचा प्रवाह ओळखून मुंबई प्रांतात आपले संस्थान सामील करण्यास मान्यता देऊन समान संस्कृती, सामाजिक व ऐतिहासिक बंधने व व्यापार उद्योग धंदे समान असलेल्या दोन विभागातील लोकांना एकत्र येण्यास संधि दिली आहे. या बद्दल श्रीमंत छत्रपती शहाजी महाराज यांचे मी अभिनंदन करतो. कोल्हापूरने श्री शाहू महाराजा-सारखे आदर्श राजे, गोखले, रानडे, या सारखे कार्यकर्ते व सुधारक, उत्कृष्ट कलावंत उत्पन्न केले असून हरिजनांच्या सुधारणेच्या प्रयत्नांची पराकाष्टा केली आहे. असा उज्ज्वल भूतकाळ असलेली कोल्हापूरची जनता आजपासून स्वतंत्र हिंदची नागरिक होत असून स्वतंत्र्य देशातील नागरिकांची कर्तव्ये जबाबदाऱ्या व सवलती त्यांना मिळतील.

ना.खेर यांनी मुंबई सरकार तर्फे श्री.छ.महाराजांनी केलेला करार पूर्णत्वाने पाळला जाईल. सरकारी नोकरांना शक्यतो मुंबई सरकारच्या नोकरीत मुरविले जाईल व त्यांच्या नोकरी बाबतीत त्यांना मिळत असलेल्या सवलती कमी होणार नाहीत असे आश्वासन दिले. शेवटी ना.खेर म्हणाले की, संस्थानात खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सरकार प्रयत्न करील. या आनंदाच्या प्रसंगी ना.खेर यांनी सरकारी साऱ्यात शें.१० टक्के प्रमाणे सारा सूट दिल्याचे व कैद्यांची शिक्षा माफ व कमी करण्याचे ठरविले असल्याचे जाहीर केले.[४६]

पंतप्रधान ना.खेर यांचे भाषण चालू असताच हिंदच्या संस्थानी खात्याचे राजकीय सल्लागार श्री.व्ही.पी.मेनन यांचे आगमन झाले, त्यावेळी सर्वांनी श्री.मेनन यांचे सहर्ष स्वागत केले.

ना.खेर यांच्या भाषणानंतर प्रशासक कॅ.व्ही.एन.जापा यांनी "हिंद युनियन की जय" असा जय घोष केला व राष्ट्रगीत झाल्यानंतर हा कार्यक्रम संपला.

मुंबई पंतप्रधान ना.खेर, हिंदच्या संस्थानी खात्याचे राजकीय सल्लागार व्ही.पी.मेनन, मुंबई सरकारचे चिफ सेक्रेटरी श्री.एम.डी.भट, यांनी दुपारी २-३० वाजता हवाई मार्गे येथून प्रयाण केले. ना.खेर व श्री.भट हे मुंबईस व श्री.मेनन हे औरंगाबादला रवाना झाले. त्यांना मोठ्या थाटाने निरोप देण्यात आला.[४७]

अशाप्रकारे हा कोल्हापूर संस्थान विलिनीकरणाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला व खऱ्या अर्थाने जनतेला आपले स्वातंत्र्य मिळाले. भारत भूमी आपणास पावन झाली. "खरी आम्ही तिची लेकरे" असे सर्वांना वाटू लागले. यासाठी प्रजा परिषदेला खूप हाल सहन करावे लागले. शेवटी त्यांचा विजय झाला. तो सोन्याचा दिवस म्हणजे १ मार्च १९४९ हा होय.

इतर दक्षिणी संस्थाने --

कोल्हापूर संस्थानाबाबत पुढारीने जे धोरण आखले होते तेच धोरण दक्षिण महाराष्ट्रातील इतर संस्थाना बाबतही अवलंबिले होते. दक्षिण महाराष्ट्रात १८ संस्थाने होती. त्यामध्ये सर्वात मोठे संस्थान कोल्हापूर होते. या संस्थानातील जनतेला एकतंत्री कारभाराविरोधी मोठा लढा द्यावा लागला. त्यासाठी कोल्हापूर संस्थानातील कांही कार्यकर्त्यांनी एकत्र कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेची स्थापना केली. आपल्या न्याय मागण्या मान्य होईपर्यन्त जबाबदार राज्य पध्दती मिळेपर्यन्त त्यांनी आपला लढा लढविला. त्या लढयात 'पुढारी' ची भूमिका समन्वयाची होती. संस्थानी राजवट व जनतेचे प्रश्न या संबंधीची आपली मते 'पुढारी' ने जनते पर्यन्त पोहचविले. तसेच त्यांनी इतर दक्षिणी संस्थानातील घडामोडीची दखल घेऊन त्यावर आपले भाष्य केले. सांगली, मिरज, बुधगाव, फलटण, सावंतवाडी इत्यादी अनेक संस्थानातील प्रश्न चव्हाट्यावर मांडले व अन्य दक्षिणी संस्थानात जागृती निर्माण करण्यास हातभार लावला.

दि. १९, २० ऑगस्ट १९३९ रोजी सांगली संस्थान प्रजा परिषदेचे १४ वे अधिवेशन हनगंडी येथे पार पडले. त्याबाबतचा सविस्तर वृत्तांत पुढारीच्या दि. २३ ऑगस्ट १९३९ च्या अंकात आढळतो तो पुढील प्रमाणे आहे --

हनगंडी येथे १९ व २० ऑगस्ट रोजी सांगली संस्थान प्रजा परिषदेचे १४ वे अधिवेशन पार पडले. अध्यक्ष श्री. चिक्कोडी हे होते. आपल्या भाषणात चिकोडी म्हणाले की संस्थानिकांनी फेडरेशन मध्ये सामील व्हावे. द्विदल राज्यपध्दती ब्रिटिश हिंदुस्थानात असमाधानकार, अयशस्वी व त्याज्य ठरली असल्याने त्या पध्दतीचा संस्थानात अवलंब करू नये. जबाबदार राज्यपध्दती स्थापन करावी. या पध्दतीचे लोकाना शिक्षण मिळावे. दुसऱ्या दिवशी कांही ठराव पास झाले ते पुढील प्रमाणे होते. (१) मतदान कमिटीने केलेल्या रिपोर्टावरून ग्रामीण मतदारांची संख्या नागर मतदारांच्या संख्येच्या मानाने

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

जितकी असावयास पाहिजे तितकी दिसून येत नाही. ती संख्या जास्त व्हावी अशी व्यवस्था दरबाराने करावी. (२) फेडरेशनला संमति देऊन त्यात प्रजेतर्फे प्रतिनिधी असावा. (३) श्रीमंतानी दगड, माती, मरूम, वाळू यावरील कर माफ केला. त्याची अंमलबजावणी मिरज तालुक्याकरिता नाही. त्याची चौकशी दरबाराने करावी. (४) गोडबोले वकिलांनी मे.डे.साहेब यांची कारकिर्दी चांगली आहे. त्यांना परत बोलवावे असा ठराव मांडला. शेवटी आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला. अशा प्रकारे हे १४ वे अधिवेशन पार पडले.[४८]

सांगली संस्थान प्रजा परिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि.४ ऑगस्ट १९४० रोजी सायंकाळी शहापूर येथे डॉ.हेरेकर यांच्या दिवाणखान्यात भरली होती. अध्यक्षस्थानी श्री.आण्णासाहेब लठ्ठे होते. कार्यकारी मंडळाच्या व रयत असेंब्लीच्या सर्व सभासदांना या सभेची निमंत्रणे मुद्दाम पाठविण्यात आली. नांद्रे येथील श्री.पाचनेर, सांगलीचे श्री.पाटणकर, फडके, कौलापूरचे श्री.मुळे वकिल व अनंतराव मुळे, उगारचे देसाई, शहापूरचे एम.डी. कुलकर्णी, टंगाच्या नाईक, हरिभाऊ सराफ, डॉ. मिळवे, सराफ, वैद्य, जोशी इत्यादी मंडळी उपस्थित होती. या सभेत खालील ठराव पास झाले
(१) प्रजा परिषदेने कार्यकारी मंडळाच्या ( दि.४ ऑगस्ट १९४० ) सभेतपास झालेल्या ठरावाची प्रत सांगली संस्थान रयत असेंब्लीच्या लोकनियुक्त व सरकार नियुक्त बिन सरकारी सभासदाकडे पाठवावी व त्यांना फिडरल राज्यपध्दती - बाबतचा बहिष्काराचा ठराव अंमलात आणाण्याबाबत विनंती करावी. या ठरावावर श्री.लठ्ठे म्हणाले की प्रजा परिषदेचा ठराव सर्वांनी पाळला पाहिजे. प्रजा परिषदेच्या वेळी रयत असेंब्लीचे बरेच सभासद उपस्थित होते. हा ठराव पास झाला. इतर सभासदांची भाषणे झाली. यामुळे येत्या असेंब्लीच्या अधिवेशनावर सर्वांकडून बहिष्कार पडेल असे वाटत आहे.[४९]

## मिरज प्रजापरिषदेचे सातवें अधिवेशन --

मिरज संस्थान प्रजा परिषादेचे सातवे अधिवेशन ता. २२ व २३ जून रोजी लक्ष्मेश्वर येथे म्हैसूर स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री.के.टी.भाष्यम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. खा.ब.देसाई,कोरे वकील,शहा वकील,बाबण्णाधुळी, महाडीक वकील, यांनी हे अधिवेशन बोलावले होते. वैद्य,जोशी,पुजारी,वकील, शिराळकर,देशपांडे इ.यामध्ये भाग घेतला होता. संयुक्त चळवळीचे तथाकथित मक्तेदार श्री.बा.वि.शि.खरे यांनी या अधिवेशनात भाग घेतला नाही. स्वागताध्यक्ष खा.ब.देसाई आपल्या भाषणात म्हणाले प्रजेची न्याय गाऱ्हाणी अत्यंत सौम्य शब्दांत पण निस्पृहपणे पुढे मांडली आहेत. सरकारी नोकऱ्यांतील परस्थ व स्थानिक वाद हा स्थानिक ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थाकरिता निर्माण केला आहे. ब्राह्मणेत्तरांनी यापुढे नोकऱ्याबद्दल तक्रार न करता सरकारी नोकऱ्यात सर्व जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळाव्यात व विद्येत मागसलेल्या बहुसंख्य समाजांना शिक्षणात इतरापेक्षा जास्त सवलती दिल्या जाव्यात अशीही मागणी करणे आवश्यक आहे. तसे ठराव मिरजेचे कार्यकर्ते पुढील अधिवेशनात पास करतील व बहुजन समाजाचे हित साधतील अशी आशा आहे. शेवटी आभार प्रदर्शन होऊन अधिवेशनाचा समारोप झाला.[५०]

## बुधगाव ( मिरज ज्युनिअर ) प्र.प.पहिले अधिवेशन --

बुधगाव ( मिरज ज्युनिअर ) प्रजा परिषादेचे प्रथम अधिवेशन रविवार ता.६ मे १९४५ ला सुरू झाले. या अधिवेशनाचे उद्घाटन कॉंग्रेसचे पुढारी श्री केशवराव जेधे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री.काकासाहेब गाडगीळ हे होते. अधिवेशनात पुढील ठराव पास करण्यात आले.

१) कायदेमंडळातील बहुमतवाल्या पक्षाने मंत्रिमंडळ बनवावे व हे मंत्रिमंडळ कायदे मंडळाला जबाबदार असावे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

२) श्री.राजेसाहेब यांच्या अधिपत्याखाली संपूर्ण जबाबदार राज्यपध्दती हे प्रजाजनांचे ध्येय आहे.

३) संस्थानात संपूर्ण जबाबदार राज्यपध्दती ताबडतोब अंमलात आणावी व कायदेमंडळ संपूर्णत: लोकनियुक्त करुन, निवडणुकी व्हात आलेल्यांच्या सार्वत्रिक मतदानाच्या तत्वावर व्हाव्यात.

४) श्रीमंत राजेसाहेबांनी या मंत्रिमंडळाच्या सल्याने राज्यकारभार चालवावा.

५) राजेसाहेबांचा खाजगी खर्च संस्थानच्या उत्पन्नाच्या १० टक्के पेक्षा जास्त नसावा.

६) संस्थानचे उत्पन्न अपूरे असल्यामुळे संस्थानाने न्यायदान,पोलीस वगैरेचा कारभार इतर संस्थाना बरोबर समायिकपणे चालवावा.[५१]

<u>सावंतवाडी प्रजा परिषद --</u>

'पुढारी' च्या ३ नोव्हेंबर १९४५ च्या अग्रलेखात सावंतवाडी संस्थान प्रजा परिषदेच्या हालचालीचा थोडक्यात आढावा घेतलेला आढळतो. सावंतवाडी संस्थानात प्रजा परिषद स्थापन होऊन तीची घटना तयार झाली आणि १९४५ च्या डिसेंबर महिन्यात प्रजा परिषदेचे अधिवेशनही झाले असा स्पष्ट उल्लेख अग्रलेखात आहे. त्यानंतर सावंतवाडीतील कांही कार्यकर्ते नजिकच्या रत्नागिरी जिल्ह्यातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्याकडे गेले व त्यांनी सावंतवाडी संस्थानात प्रजा परिषद स्थापन करण्यासाठी सहकार्याची विनंती केली तथापि देशातील प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुका जवळ आल्या असल्याने सावंतवाडी संस्थानात प्रजा परिषद स्थापन करण्याचा प्रश्न लांबणीवर टाकावा अशी सूचना रत्नागिरी जिल्ह्यातील कॉंग्रेस नेत्यांनी केली. अशा प्रकारे सावंतवाडी संस्थानात प्रजा परिषदेच्या स्थापने विषयी परस्पर विरोधी विधाने प्रस्तुत अग्रलेखात आढळतात. संस्थानात प्रजा परिषद स्थापन करण्याविषयी 'पुढारी' कारांनी याच अग्रलेखात आपले स्वतंत्र स्पष्ट मत नोंदले आहे. ते म्हणतात की ज्या ज्या संस्थानात प्रजा परिषद आहे तेथे थोडी फार राजकीय प्रगती झालेली

आहे. राजकीय घटनात्मक प्रगतीच्या आभावी सावंतवाडी संस्थान कोल्हापूर संस्थानच्या सामायिक हायकोर्टाच्या योजनेत सामील होऊ शकले नाही. प्रजा परिषदे मार्फत जनतेचे पाठबळ मिळाले तर आपणाला मंत्रीपद मिळेल या विचारांने जर सावंतवाडी संस्थान प्रजा परिषद जन्माला येणार असेल तर ती जन्माला न आलेली पत्करली. राजकारणा पेक्षा प्रजेची निरपेक्ष सेवा हा प्रजा परिषदेचा स्थापनेचा हेतू असला पाहिजे तसा तो नसेल तर सध्याची एकतंत्री राजवट परवडेल. त्यामुळे नको असलेली दोषपूर्ण लोकशाही राबविण्यासाठी होणाऱ्या खर्चाला तरी पायबंद बसेल. [५२]

सावंतवाडी संस्थानात प्रजा परिषदे बाबतची वस्तुस्थिती थोडीशी वेगळी असल्याचे आढळले. सावंतवाडी संस्थानातील मुंबईत राहाणाऱ्या नागरिकांनी बऱ्याच पूर्वी म्हणजे १९२८ रोजी सावंतवाडी प्रजा परिषदेची स्थापना केली होती. त्याच प्रमाणे सावंतवाडी संस्थानात प्रजा परिषदेची १९४५ सालापूर्वीच कांही अधिवेशने मुंबईत भरल्याचे उल्लेख आढळतात. मात्र मुंबईत कामकरणारी सावंतवाडी संस्थान प्रजा परिषद खुद्द संस्थानी प्रदेशात ४५ साला-पर्यन्त काम करत असल्याचे आढळत नव्हते.

## हैद्राबाद संस्थान --

हैद्राबाद संस्थान हे द:क्खन मधले सर्वात मोठे संस्थान होते. या संस्थानांचे वैशिष्टय म्हणजे तेथील संस्थानिक हा मुस्लीम होता.तर बहुसंख्य प्रजा हिंदू होती. येथील प्रजेच्या प्रामुख्याने दोन मागण्या होत्या (१) हे संस्थान भारतीय संघ राज्याने विलीन करावे (२) या संस्थानात जबाबदार राज्यपध्दती असावी. या दोन्ही मागण्या संस्थानिकाला मान्य नव्हत्या. या साठी जनतेला मोठ्या प्रमाणात लढा करावा लागला. लढा सत्याग्रहाच्या मार्गाने चालू होता. या लढयावर निजामाने बंदी घातली.लढयातील कार्यकर्त्यांना तरुंगात डांबले, त्याचा तरुंगात छळ केला, काही लोकाना हद्दपार केले.

हैद्राबाद संस्थानात निजामाची सत्ता अनियंत्रीत होती. तो स्वत:ला संस्थानाचा प्रमुख म्हणून आपण स्वत:च लोकांचे साक्षात प्रतिनिधी आहोत म्हणून आपले व लोकांचे संबंध कुठल्याही बदलणाऱ्या लोकनियुक्त प्रतिनिधीच्या संबंधापेक्षा अधिक नैसर्गिक आहेत. व अधिक हितकारक आहेत, अशी निजामाची धारणा होती.तो संस्थानचा सर्व सत्ताधीश होता, तसेच जनतेच्या सार्वभौमत्वाचा-ही तो प्रतिक होता. निजामाच्या सार्वभौमत्वाचे लोण मुस्लिम जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यन्त पोहोचविण्यात आले होते. त्यामुळे मुसलमान व्यक्तीने स्वत:कडे सार्वभौमत्वाचे अधिकार घेतले होते. निजाम हा ब्रिटिशांचा विश्वासू दोस्त होता. त्याला संस्थानातील मुस्लिम धर्माधिकाऱ्यांचा व काही बाहेरील शक्तीचाही पाठिंबा होता. कांही मुसलमान मंडळी सरकारला धमकी देत होती की संस्थान हिंद संघराज्यात विलीन झाले तर हैद्राबाद संस्थानात रक्ताचे पाट वाहातील सगळीकडे हाहा:कार माजेल व त्यास हिंद सरकारला जबाबदार राहावावे लागेल. तथापि या संस्थानाचे शेवटी विलिनीकरण झालेले आपणास पहावयास मिळाले.

ब्रिटिश अधिसत्ता संपुष्टात आल्यानंतर हैद्राबाद संस्थान कोणत्याच घटना समितीत जाणार नाही व हैद्राबादला स्वतंत्र सार्वभौम राज्याचा दर्जा प्राप्त होण्याचा अधिकार आहे ,अशा तऱ्हेचे निजामांनी फर्मान काढले होते. विलिनीकरणाच्या करारावर निजाम सही करण्यास तयार नव्हता. हैद्राबाद हे हिंद संघराज्याचा घटक नाही असे त्याचे ठाम मत होते. निजाम जरी विलीनीकरणास तयार होत नसला तरी संस्थानात विलीनीकरणासाठी मोठया प्रमाणात जन आंदोलन चालू होते. स्वामी रामानंद तिर्थ यांच्या सारख्या नेत्यांनी राजकीय चळवळीची सूत्रे हाती घेतली होती. त्यांनी त्यासाठी त्रास सोसला, तुरुंगवास झाला पण हाती घेतले कार्य पूर्ण केले. त्यानी संस्थानात मोठया प्रमाणात काँग्रेसची बिजे पेरली .या जोरावर निजामाला हैराण केले. बाहेरील शक्तीचा निझामाला पाठिंबा होता पण त्याचा काही उपयोग झाला नाही. राजा आला नाही तर चालेल पण स्वतंत्र भारताबरोबर राहाण्याचा जनतेने आपला दृढनिश्चिय एकमुखाने प्रकट केला होता. " आम्ही भारतीय आहोत व निझामाची

इच्छा असो वा नसो, हैद्राबाद देशाच्या उर्वरित भागाशी पूर्णपणे एकरूप आहे अशी जनतेची तळमळ होती.या जनतेच्या लढ्यामुळे व ना.पटेलांच्या धोरणामुळे संस्थानचे हिंदी संघ राज्यात विलिनीकरण झाले.

दि.३० सप्टेंबर १९४५ च्या ' पुढारी ' च्या अग्रलेखात हैद्राबाद प्रजेच्या मागण्याबाबत मत व्यक्त केले आहे. श्री.स्वामी रामानंदतीर्थ यांनी पत्राद्वारे खालील मागण्या केल्या आहेत --

१) जबाबदार राज्यपध्दतीचे ध्येय मान्य करण्यात यावे.
२) हैद्राबाद कॉंग्रेसवर घातलेली बंदी ताबडतोब उठविण्यात यावी.
३) संपूर्ण नागरिक स्वातंत्र्य देण्यात यावे.

त्याप्रमाणे वयात आलेल्या सर्व लोकांना मतदानाचा अधिकार असावा. पूर्णपणे निवडलेले कायदेमंडळ असावे. कायदे मंडळाला सर्व अधिकार असावेत. कार्यकारी मंडळाची निवडणूक कायदेमंडळातून व्हावी व ते त्याला जबाबदार असावे.

संस्थानात सभा स्वातंत्र्य संघ स्वातंत्र्य मुद्रण स्वातंत्र्य वगैरे नागरिक हक्कांचा अभाव आहे. प्रादेशिक प्रतिनिधित्वाचे तत्व अमान्य ठरवून आर्थिक हितसंबंधावर मतदार संघ निर्माण करुन जहागिरदार,कारखानदार, वकिल, डॉक्टर,पदवीधर ,मजूर,शेतकी अशाप्रकारच्या निरनिराळ्या वर्गाकरिता प्रतिनिधित्व देण्याची मसालेवाईक तरतूद या घटनेत होती. या संस्थानात ९०टक्के हिंदूंना, १० टक्के मुसलमानांच्या इतके प्रतिनिधित्व देण्यात आले होते. हैद्राबाद दरबारने या घटनेत नमूद केले आहे की,कायदेमंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था यात हिंदू व मुसलमान यांचे प्रतिनिधी सारखे राहील व सर्वांना समान न्याय मिळेल. या संस्थानात मात्र तसे घडले नाही. संस्थानात बहुसंख्याक हिंदू शेतकरी व मजूरवर्गाला संस्थानच्या कारभारात स्थान नव्हते असे मत स्वामी रामानंद तीर्थ यांनी व्यक्त केले आहे. हैद्राबादच्या निजामांनीच नव्हे तर इतर संस्थानिकांनीही त्यांचा विचार करुन आपापल्या संस्थानातील राज्यकारभारात फेरफार करावे असे मत ' पुढारी ' कारांनी व्यक्त केले आहे.[५३]

हैद्राबाद कॉंग्रेसच्या धोरणाच्या बदला बाबत, पुढारी च्या दिनांक २६ मे १९४९ च्या अग्रलेखात खालील मत व्यक्त केले आहे. गुलामगिरी नष्ट झाली तरी पण भाषाकि प्रदेशाची अडचण राहतेच बहुभाषीक प्रदेशाचा एकत्र राज्यकारभार जनतेला सुखावह होत नाही. हैद्राबाद संस्थानचे मराठी, कानडी व तेलगू असे भाषावार तुकडे पाडून ते शेजारच्या प्रांतात विलिन करण्याची मागणी स्वामी रामानंद तीर्थ यांनी पुण्याच्या मुक्कामात केली होती म्हणून स्टेट कॉंग्रेसने जबाबदार सरकारचा नाद सोडून याच मागणीला जोर लावून हैद्राबादचे भाषाविलिनीकरण साध्य करून घेणे हे जनतेच्या हिताचे ठरेल असे मत पुढारी ने व्यक्त केले आहे.[५४]

अखिल हैद्राबाद कॉंग्रेस कमिटीच्या ता.१ जुलै १९४९ रोजी रात्री संपलेल्या बैठकीत घटना समितीच्या निवडणुका होण्याची वाट न पाहता हैद्राबाद संस्थानच्या राज्यकारभाराचे लोकशाहीकरण करण्याचे काम ताबडतोब सुरु व्हावे अशी मागणी करणारा ठराव पास केला. निवडणुकीने स्थानिक स्वराज्य संस्था सुरु केल्या जाव्यात असे मत कॉंग्रेस कमिटीने व्यक्त केले .नजीकच्या भाषिक प्रदेशात विलीन व्हावे असे कमिटीला वाटले तरी इतर प्रश्नांबरोबरच हा प्रश्न लोकशाहीवर आधारित घटना समिती सोडविल असे कॉंग्रेस कमिटीचे मत आहे.[५५]

हैद्राबादच्या निजामाने असे फर्मान काढले की, मेजर ज.चौधरी यांच्या नंतर १ डिसेंबर १९४९ पासून श्री वेलोदी हे हैद्राबाद संस्थानाचे मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतील. परंतु त्यांच्या बरोबर सध्याचे प्रमुख मुलकी प्रशासक श्री.डी. एस.बाखले व इतर प्रमुख अधिकारी मंत्रिमंडळाचे सभासद म्हणून काम पहातील. इतर अधिकाऱ्यामध्ये नबाब झैन यारजंग बहादूर, राजा दोंदराज, राजा शेषाद्री, श्री सी.व्ही.एस.राव व श्री.कृष्णराव यांना मंत्रिमंडळात समाविष्ठ करून घेतले.[५६]

## निजामाला जीवदान --

दि.२४ डिसेंबर १९४९ च्या आपल्या अग्रलेखात पुढारी ने निजामाला जीवदान कसे मिळाले याची चर्चा करून शेवटी त्याबाबत आपला परखड अभिप्राय दिला आहे. निजामाचें अत्याचार व हिंद विरोधी कारवाया शिगेला पोहोचल्यानंतर हिंद सरकारने दि.१३ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थान विरुध्द

"पोलिस उपाय योजना" सुरु केली. पाच दिवसांत संस्थानचा कब्जा घेतला. संस्थानात लष्करी राजवट स्थापून सर्व राज्ययंत्रणा साफ सूफ करण्यात आली व सरंजामशाही नष्ट करण्यात आली. त्यावरुन जनतेने अशी अपेक्षा बाळगली की, निजामाला पेन्शनीत काढून भारताच्या प्रांतात संस्थानाचे विलिनीकरण होईल पण तसे घडले नाही. हैद्राबाद संस्थान एक घटक म्हणून राहिले. गव्हर्नर जनरल श्री. राजगोपालाचारी यांनीच हैद्राबादला दिलेल्या भेटीच्या वेळी असे सांगितले की "निजामांना काळजी लागली आहे की, गेल्या तीन शतकात स्वतःचे अस्तित्व राखलेले आपले संस्थान नव्या लोक सत्ताकात घटक म्हणून मानाने राहावे व लोक सुखी व्हावेत .अत्यंत बिकट व वादळाच्या परिस्थितीत स्थापन झालेल्या संस्थानच्या या राजवंशाच्या प्रतिनिधीने अशी इच्छा बाळगावी हे वाजवी होय" मात्र या मुद्यावर पुढारी ने वेगळी भूमिका घेतली व आपले स्पष्ट मत पुढील प्रमाणे मांडले " मार्च १९५० रोजी निवडणुका होणाऱ्या संस्थानच्या घटनांसमितीवर या मताचीच छाप पडली तर हैद्राबाद बाबत इतिहासांतील घोडचूकीचीच पुनरावृत्ती होईल. जहाल पक्ष आणि भाषांवार प्रांतरचनेचे पुरस्कर्ते त्यांनाही हैद्राबादचे विलिनीकरण हे एक प्रचाराचे साधन मिळेल व त्यांचे बळ वाढीला लागेल असे मत" पुढारी" कारानी व्यक्त केले.[५७]

उपपंतप्रधान सरदार पटेल यांनी दि. ६ ऑक्टोबर १९५० रोजी हैद्राबाद स्टेटकाँग्रेसच्या कार्यकर्त्यांना आपआपसांतील मतभेद मिटविण्याचा आणि राज्यकारभाराची जबाबदारी पूर्णपणे स्वीकारण्यासाठी ऐक्याचा संघ बनविण्याचा आदेश दिला. हैद्राबादचा राज्यकारभार राज्यातील जनतेच्या हाती शक्य तितक्या लौकर सुपूर्त करण्यास भारत सरकार उत्सुक असल्याचे सांगून सरदार पटेल म्हणाले " पण तसे त्यावेळी करण्यात येईल की जेव्हा तुम्ही आपआपसातील मतभेद मिटवाल व जबाबदारी स्वीकारण्याइतपत बळकट व्हाल" शहा मंझील मध्ये हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांपुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या सल्ल्याप्रमाणे वागून कार्यकर्त्यांनी स्टेट काँग्रेस बलवान केली तर निवडणुकीनंतर त्यांच्यावर पडणारी जबाबदारी पेलण्यास ते पात्र होतील अशी आशा करण्यास हरकत नाही.[५८]

वरील विवेचनावरून ' पुढारी ' वृत्त पत्राने कोल्हापूर व अन्य दक्षिणी संस्थानात झालेल्या प्रजा पक्षीय चळवळीचा यथायोग्य परामर्श घेतल्याचे दिसून येते. ' पुढारी ' च्या अग्रलेखातून वेळोवेळी स्पष्ट, स्वतंत्र मते, आणि परखड अभिप्राय व्यक्त केलेले दिसतात. कोल्हापूर संस्थान प्रजा परिषदेतील अंतर्गत संघर्षावर ' पुढारी ' च्या अग्रलेखात केलेले भाष्य मार्मिक आहे. त्याच प्रमाणे हैद्राबादच्या नबाबाच्या तथाकथित उदात्त हेतूची गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालचारी यांनी मुक्तकंठाने केलेली स्तुती कशी अवाजवी आहे हे निर्भिडपणे ' पुढारी ' ने आपल्या अग्रलेखात मांडले. हैद्राबादच्या बाबत निर्णय घेताना भारत सरकारच्या हातून इतिहासातील घोडचूकीची पुनरावृत्ती होऊ नये असा इशारा देण्यासही ' पुढारी ' कार कचरले नाहीत. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात दक्षिण महाराष्ट्रात झालेल्या राजकीय चळवळीचे विशेषत: दक्षिणी संस्थानी प्रदेशातील चळवळीचे स्पष्ट प्रतिबिंब ' पुढारी ' तच आपणास पहावयास मिळते. संस्थानी प्रदेशातील चळवळ सनदशीर मार्गाने चालण्यास ' पुढारी ' ने मोलाचा हातभार लावला.

## संदर्भ व तळ टिपा


| | | |
|---|---|---|
| १ | दै.पुढारी कोल्हापूर | ता. ४ जानेवारी, १९३९ पान क्र. १, २ |
| २ | ,, | ता. ५ जानेवारी, १९३९ पान क्र. २. |
| ३ | ,, | ता. ६ जानेवारी, १९३९ पान क्र. २. |
| ४ | ,, | ता. ८ जानेवारी, १९३९, पान नं. १ |
| ५ | ,, | ता. १० जानेवारी, १९३९, पा.नं. २. |
| ६ | ,, | ता. १३ जानेवारी, १९३९, पा.नं. १. |
| ७ | ,, | ता. १५ जानेवारी, १९३९, पा.नं. १ |
| ८ | ,, | ता. २६ फेब्रुवारी, १९३९, पा.नं. २ |
| ९ | माधवराव बागल -जीवन प्रवाह (भाग२) पृ.क्र. ३७-३८. | |
| १० | दै.पुढारी, कोल्हापूर | ता. १७ मार्च १९३९, पा.नं. १ |
| ११ | ,, | ता. १९ मार्च १९३९, पा.नं. २ |
| १२ | ,, | ता. ७ एप्रिल १९३९, पा.नं. ३ |
| १३ | ,, | ता. २८ एप्रिल १९३९, पा.नं. ३ |
| १४ | ,, | ता. ३१ मार्च १९३९, पा.नं. १ |
| १५ | महाराष्ट्र स्टेट गॅझोटिअर - कोल्हापूर, डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र सरकार, -- -- १९६०. | |
| १६ | दै.पुढारी, कोल्हापूर | ता. ९ जुलै १९३९, पा.नं. १ |
| १७ | ,, | ता. ११ डिसेंबर १९४१, पा.नं. २ |
| १८ | ,, | ता. २५ डिसेंबर, १९४१, पा.नं. १ |
| १९ | ,, | ता. १४ डिसेंबर १९४१, पा.नं. २ |
| २० | ,, | ता. ८ फेब्रुवारी १९४२, पा.नं. ३ |
| २१ | ,, | ता. २ जून १९४२, पा.नं. १ |
| २२ | ,, | ता. ७ जून १९४२, पा.नं. २ |
| २३ | ,, | ता. १५ जुलै १९४२, पा.नं. ३ |
| २४ | ,, | ता. १२ सप्टेंबर १९४२, पा.नं. २. |

२५ दै.पुढारी,कोल्हापूर ता.१७ ऑगस्ट १९४२,पा.नं.१

२६ ,, ता.२ मे १९४३,पा.नं.१

२७ ,, ता.५ मे १९४४,पा.नं.२

२८ ,, ता.४ ऑक्टोबर १९४५,पा.नं.२

२९ ,, ता.३० जानेवारी १९४६,पा.नं.१

३० ,, ता.२७ मार्च १९४६,पा.नं.१

३१ ,, ता.२ ऑगस्ट १९४६ पा.नं.१

३२ ,, ता.२८ मे १९४७,पा.नं.२

३३ ,, ता.७ जून १९४७,पा.नं.१.

३४ ,, ता.२५ जून १९४७,पा.नं.२

३५ ,, ता.१९ नोव्हेंबर १९४७,पा.नं.२

३६ ,, ता.२० नोव्हेंबर १९४७,पा.नं.१

३७ प्रा.कणबरकर रा.कृ. व प्रा.डॉ.जाधव रमेश - भाई माधवराव बागल संक्षिप्त चरित्र - बागल विद्यापीठ,कोल्हापूर,पृ.क्र. ४९ ते ५१.

३८ माधवराव बागल - जीवन प्रवाह- भाग २ पृ.५९-६०

३९ दै.पुढारी ,कोल्हापूर ता.२३ जानेवारी १९४९,पा.नं.१.

४० ,, ता.२ फेब्रुवारी १९४९,पा.नं.२

४१ ,, ता.२ फेब्रुवारी १९४९,पा.नं.३

४२ प्रा.कणबरकर रा.कृ. व प्रा.डॉ.जाधव रमेश - भाई माधवराव बागल संक्षिप्त - पा.नं.५१

४३ दै.पुढारी,कोल्हापूर ता. २० फेब्रुवारी १९४९,पा.नं.१

४४ ,, ता.१ मार्च १९४९,पा.नं.१

४५ ,, ता.१ मार्च १९४९,पा.नं.१-२,

४६ ,, ता.२ मार्च १९४९,पा.नं.२

४७ ,, ता.२ मार्च १९४९,पा.नं.३

४८ ,, ता.२३ ऑगस्ट १९३९,पा.नं.३

| | | |
|---|---|---|
| ४९ | दै.पुढारी,कोल्हापूर | ता.८ ऑगस्ट १९४०,पा.नं.२ |
| ५० | ,, | ता.३० जून १९४०,पा.नं.२ |
| ५१ | ,, | ता.८ मे १९४५,पा.नं.२ |
| ५२ | ,, | ता.३ नोव्हेंबर १९४५,पा.नं.२ |
| ५३ | ,, | ता.३० सप्टेंबर १९४५,पा.नं.२ |
| ५४ | ,, | ता.२६ मे १९४९,पा.नं.२ |
| ५५ | ,, | ता.२ जुलै १९४९,पा.नं.१ |
| ५६ | ,, | ता.२ सप्टेंबर १९४९,पा.नं.३ |
| ५७ | ,, | ता.२४ डिसेंबर १९४९,पा.नं.२ |
| ५८ | ,, | ता.७ ऑक्टोबर १९५०,पा.नं.१. |